## सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २० जानेवारी २०२२ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**राष्ट्रीय कौशल्य अर्हता आराखडा यानुसार कोशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण आणि उद्योजकता शिक्षण व महाराष्ट्र राज्यातील इतर कौशल्य पाठ्यक्रम यांच्याशी संबंधित असणा-या बाबींचे नियमन करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक इतर बाबींसाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ स्थापन करण्यासाठी व विधिसंस्थापित करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राष्ट्रीय कौशल्य अर्हता आराखडा यानुसार कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण आणि उद्योजकता शिक्षण व महाराष्ट्र राज्यातील इतर कौशल्य पाठ्यक्रम यांच्याशी संबंधित असणा-या बाबींचे नियमन करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक इतर बाबींसाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ स्थापन करणे व विधिसंस्थापित करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे:-

### प्रकरण एक
### **प्रारंभिक**

**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.-** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ अधिनियम, २०२१ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

**२. व्याख्या.-** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,-

(क) "संलग्न परिसंस्था" याचा अर्थ, जिला मंडळाकडून संलग्नता देण्यात आलेली आहे अशी परिसंस्था, असा आहे;

(ख) "शिकाऊ उमेदवारी" याचा अर्थ, शिकाऊ उमेदवारीच्या करारानुसार पूर्ण केलेला कोणत्याही उद्योगामधील किंवा आस्थापनेमधील प्रशिक्षण पाठ्यक्रम, असा आहे;

(ग) "मंडळ" याचा अर्थ, कलम ३ अन्वये स्थापन केलेले महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, असा आहे;

(घ) "उप-विधी" याचा अर्थ, या अधिनियमान्वये तयार केलेले मंडळाचे उप-विधी, असा आहे;

(ङ) "केंद्र सरकार" याचा अर्थ, भारत सरकार, असा आहे;

(च) “समित्या” याचा अर्थ, कलम २० अन्वये घटित केलेल्या मंडळाच्या समित्या, असा आहे;

(छ) “श्रेयांक आराखडा” याचा अर्थ, नेमून दिलेले काम यशस्वीपणे किंवा कार्यक्षमपणे पार पाडण्याची किंवा त्यास उर्ध्वगामी व समस्तर गतिशीलता देण्याची सक्षमता साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांकरिता मंडळाने विकसित केलेला, शिक्षण, कौशल्ये व अध्ययन श्रेयांक यांच्या मापन घटकांच्या आधारे तयार केलेला आराखडा, असा आहे;

(ज) “संचालक” याचा अर्थ, कलम ७ च्या पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेला महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचा संचालक, असा आहे;

(झ) “विद्यमान मंडळ” याचा अर्थ, शासनाने घटित केलेले महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ, असा आहे;

(ञ) “शासन” याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(ट) “नियामक परिषद” याचा अर्थ, कलम ९ अन्वये स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाची नियामक परिषद, असा आहे;

(ठ) “परिसंस्था प्रमुख” किंवा “प्राचार्य” याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या व त्याने मान्यता दिलेल्या परिसंस्थेचा, कोणत्याही नावाने पदनिर्देशित केलेला प्रमुख, असा आहे;

(ड) “परिसंस्था” याचा अर्थ, प्रमाणपत्र किंवा पदविका स्तरीय व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, कौशल्य विकास व उद्योजकता शिक्षण पाठ्यक्रम देण्याकरिता मंडळाशी संलग्न असलेली व मंडळाने मान्यता दिलेली परिसंस्था, असा आहे;

(ढ) “महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद” याचा अर्थ, शासनाने घटित केलेली महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद, असा आहे;

(ण) “राष्ट्रीय व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिषद” याचा अर्थ, केंद्र सरकारने स्थापन केलेली राष्ट्रीय व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिषद, असा आहे;

(त) “राष्ट्रीय व्यावसायिक मानके” याचा अर्थ, क्षेत्र कौशल्य परिषदांनी किंवा, यथास्थिति, राष्ट्रीय कौशल्य अर्हता समितीने तयार केलेली राष्ट्रीय व्यावसायिक मानके, असा आहे;

(थ) “राष्ट्रीय कौशल्य विकास अभिकरण” याचा अर्थ, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) अन्वये सोसायटी म्हणून नोंदणी केलेले राष्ट्रीय कौशल्य विकास अभिकरण, एक स्वायत्त संस्था, असा आहे;

(द) “राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ” याचा अर्थ, कंपनी अधिनियम, २०१३ (२०१३ चा १८) अन्वये नोंदणी केलेले, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ, एक कंपनी, असा आहे;

(ध) “राष्ट्रीय कौशल्य अर्हता समिती” याचा अर्थ, भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाने (आर्थिक कामकाज विभागाने) तयार केलेली राष्ट्रीय कौशल्य अर्हता समिती, असा आहे;

(न) “राष्ट्रीय कौशल्य अर्हता आराखडा” याचा अर्थ, भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाने (आर्थिक कामकाज विभागाने) अधिसूचित केलेला राष्ट्रीय कौशल्य अर्हता आराखडा, असा आहे;

(प) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे.

(फ) "विनियम" याचा अर्थ, या अधिनियमान्वये मंडळाने केलेले विनियम, असा आहे.

प्रकरण दोन

## मंडळाची व नियामक परिषदेची स्थापना व रचना

**३. मंडळाची स्थापना.-** शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता, "महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ" या नावाने संबोधले जाणारे एक मंडळ स्थापन करील.

**४. मंडळाचे विधिसंस्थापन.-** (१) कलम ३ अन्वये स्थापन केलेले मंडळ हे अखंड परंपरा व सामाईक मोहोर असणारे एक निगम निकाय असेल, आणि त्यास करार करण्याचा, स्थावर किंवा जंगम अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा व तिची विल्हेवाट लावण्याचा, आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करण्याचा अधिकार असेल आणि त्याच्या निगम नावाने त्यास दावा करता येईल व त्याच्यावर दावा लावता येईल.

(२) मंडळाचे मुख्यालय, मुंबई येथे असेल आणि व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य याच्या जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयांच्या ठिकाणी जिल्हास्तरीय कार्यालय असेल.

**५. मंडळाची रचना.-** (१) मंडळ, पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असे:-

| | |
|---|---|
| (क) संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, | अध्यक्ष; |
| (ख) सहसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांची नामनिर्देशित व्यक्ती, | पदसिद्ध सदस्य; |
| (ग) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, किंवा विभागीय मंडळाच्या अध्यक्षाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली त्याची नामनिर्देशित व्यक्ती, | पदसिद्ध सदस्य; |
| (घ) उद्योग संचालक, महाराष्ट्र राज्य किंवा सहसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली त्याची नामनिर्देशित व्यक्ती, | पदसिद्ध सदस्य; |
| (ङ) शासनाचा सहसचिव किंवा उपसचिव, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, | पदसिद्ध सदस्य; |
| (च) उपायुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई, | पदसिद्ध सदस्य; |
| (छ) प्रादेशिक संचालक, प्रादेशिक कौशल्य विकास व | पदसिद्ध सदस्य; |

उद्योजकता संचालनालय, भारत सरकार, मुंबई,

(ज) संचालक, शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण मंडळ (पश्चिम विभाग), भारत सरकार, मुंबई, — पदसिद्ध सदस्य;

(झ) उद्योग संघातून शासनाने नामनिर्देशित करावयाचे दोन सदस्य, — सदस्य;

(ञ) परिसंस्थेच्या प्रमुखामधून शासनाने नामनिर्देशित करावयाचे तीन सदस्य, त्यापैकी किमान एक महिला असेल, — सदस्य;

(ट) व्यवसाय शिक्षण, प्रशिक्षण, कौशल्य विकास व उद्योजकता शिक्षण या क्षेत्रातील विशेष ज्ञान व अनुभव असणा-या व्यक्तीमधून शासनाने नामनिर्देशित करावयाचे तीन सदस्य, — सदस्य;

(ठ) सचिव, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ. — सदस्य-सचिव.

(२) पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त मंडळाचे सदस्य म्हणून वेळोवेळी नामनिर्देशित करण्यात आलेल्या अन्य व्यक्तींची नावे व पदावधी, शासनाकडून **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील.

(३) ज्याच्या आधारे, एखाद्या व्यक्तीची अशाप्रकारे नियुक्ती केली असेल ते पद, पदनाम किंवा, यथास्थिति, अधिकारपद धारण करण्याचे समाप्त होताच ती व्यक्ती, मंडळाचा सदस्य म्हणून पद धारण करण्याचे समाप्त होईल आणि अशी व्यक्ती, तेव्हापासून एका आठवड्याच्या आत, ती मंडळाचा सदस्य असण्याचे समाप्त झाली असल्याचे अध्यक्षाला लेखी कळवील.

**६. मंडळाची उद्दिष्टे.-** मंडळाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे असतील,-

(१) उद्योग, उद्योग संघ, इत्यादींनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता दिलेली व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यातील एक गुणवत्ता प्राप्त अग्रेसर परिसंस्था म्हणून उदयास येणे;

(२) उद्योगांना लागणा-या कुशल मनुष्यबळाच्या गरजा समजून घेण्यासाठी आणि व्यवहार्य व वास्तव जागतिक वातावरणामध्ये शिकण्यासाठी, युवकांकरिता भागीदारी निर्माण करण्याकरिता, उद्योगांसोबत सतत सहभाग घेणे आणि सहभाग घेण्यास प्रोत्साहन देणे;

(३) उदयोन्मुख कल समजून घेण्याच्या दृष्टीने, श्रमिक बाजारपेठेच्या आवश्यकतांमधील संशोधन करणे आणि यथोचित अभ्यासक्रम, पाठ्यक्रम व कार्यक्रम सुरू करणे;

(४) परस्पर लाभांकरिता उद्योग-शैक्षणिक क्षेत्र यांमध्ये भागीदारी निर्माण करण्यासाठी भारतातील व भारताबाहेरील अन्य परिसंस्था, उद्योग व औद्योगिक संघ यांच्याशी दुवा साधणे, सहयोग करणे व भागीदारी प्रस्थापित करणे;

(५) विशिष्ट सानुकूलित केलेल्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमांचे संकल्पन, संकल्पचित्रण, विकास करण्यासाठी व ते देण्यासाठी आणि विद्यार्थी, प्रशिक्षक व इतर यांच्याकरिता कार्यक्रमांचे आदानप्रदान करण्याकरिता, भारतातील किंवा परदेशातील इतर परिसंस्था, नफा व ना-नफा संघटना, निगम, उद्योग, उद्योग संघ, व्यावसायिक संघ किंवा इतर संघटना यांच्यासोबत सहयोग करणे;

(६) जे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण देण्यात सहभागी झालेले आहेत असे अध्यापक व प्रशिक्षक यांच्याकरिता अध्यापनशास्त्रीय व कौशल्यवर्धक प्रशिक्षण व विकास कार्यक्रम आयोजित करणे;

(७) कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांच्या किंवा मंडळाने यथोचित म्हणून मानलेल्या राष्ट्रीय तत्त्वांवर घडविलेल्या विविध स्तरांवरील कौशल्यविषयक निपुणता व क्षमता असलेले गुणवत्तापूर्ण युवक विकसित करणे;

(८) देशाची व जगाची कौशल्यपूर्ण रोजगाराची गरज भागविण्यासाठी, कौशल्ये, अध्ययन आणि उद्योजकताविषयक प्रेरणा व उद्योजकता यांनी परिपूष्ट असलेले सक्षम, कुशल व समर्थ युवक विकसित करणे;

(९) ज्या क्षेत्रांमध्ये भविष्यात नोक-या निर्माण होणार आहेत अशा, स्वयंचलित, वस्त्र व फर्निचर, गालिचे, पडदे, इत्यादी, विमानचालन व अंतरिक्षयान, प्रसार माध्यम व मनोरंजन, चित्रपट, भांडवली वस्तू, दळणवळण, संकल्पचित्रण, तंत्रज्ञान, व्यवस्थापन व उद्योजकता, व्यवसाय, बँक व्यवसाय व विमा, आरोग्य सेवा, आदरातिथ्य, मालवाहतूक, क्रीडा, प्रवास व पर्यटन, जीवन शास्त्रे, उपयोजित व सृजनशील कला, मानव्यविद्या, विदा शास्त्र व कृत्रिम बुद्धिमत्ता, ई-व्यवसाय, किरकोळ विक्री, विश्लेषण, कृषी व्यवसाय, ४.० उद्योगाशी संबंधित असलेले उद्योग व रोजगारक्षमता असलेले कौशल्य शिक्षण देण्यासह अन्य कोणतीही अभ्यास क्षेत्रे यांसारख्या क्षेत्रांमध्ये, वेळोवेळी संबंधित असतील अशी, ज्ञान क्षेत्रे व विशेषज्ञता यांच्या विस्तृत विविधतेचा समावेश असलेले अध्ययन, अध्यापन, क्षमता, योग्यता व कौशल्य विकास आणि उद्योजकता विषयक प्रशिक्षण देणे;

(१०) शिक्षण व कौशल्य यांच्या प्रकारांमधील प्रगतीचे व गतिशीलतेचे मार्ग सुनिश्चित करण्यासाठी शालेय शिक्षणासह एकात्मिक व सर्वंकष रीतीने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांचा समावेश असणा-या कौशल्य शिक्षणाला चालना देणे;

(११) नाविन्यपूर्ण दृष्टिकोनांसह नवीन व उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये कौशल्यनिर्मिती, कौशल्यवृद्धी व पुनर्कौशल्य निर्मिती यांकरिता कौशल्य विकास कार्यक्रम सुरू करणे आणि निरंतर गुणवत्तापूर्ण व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम देऊ करणे;

(१२) परंपरागत किंवा मिश्र किंवा दूरस्थ किंवा मुक्त किंवा ऑनलाईन शिक्षण आणि वेगवेगळ्या अध्यापनशास्त्रीय दृष्टिकोनांशी व पद्धतींशी अनुरूप शिक्षण देणारी इतर प्रतिमाने यांमार्फत देऊ केलेल्या मंडळाच्या पाठ्यक्रमांमधून विद्यार्थ्यांना आजीवन व सातत्यपूर्ण प्रशिक्षणाची संधी देणे;

(१३) उत्पादन क्षमता विकसित करण्याच्या दृष्टीने, लाभदायक रोजगार व उद्योजकता निर्माण करणाऱ्या विविध कार्यक्रमांद्वारे अनौपचारिक क्षेत्र व असंघटित कामगार यांना कौशल्य विकासाच्या, व्यवसाय शिक्षणाच्या व प्रशिक्षणाच्या संधी पुरविणे;

(१४) परीक्षा घेणे व मूल्यनिर्धारण करणे आणि मंडळ निर्धारित करील अशा शर्तींच्या अधीन राहून, व्यक्तींना पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाध्या प्रदान करणे आणि अशा कोणत्याही पदविका, प्रमाणपत्रे किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाध्या विहित रीतीने काढून घेणे किंवा रद्द करणे;

(१५) मंडळांमधील किंवा विद्यापीठांमधील किंवा ज्ञान प्रांतातील किंवा क्षेत्रांतील चलनशीलतेसाठी बहुविध प्रवेशाचे किंवा बाहेर पडण्याचे पर्याय निर्माण करण्याकरिता आणि संधी उपलब्ध करून देण्यासाठी श्रेयांक अधिकोषण (क्रेडिट बँकिंग) किंवा हस्तांतरण प्रणाली निर्माण करण्याची यंत्रणा व सुविधा देणे;

(१६) उच्च वाढ असलेल्या क्षेत्रांतील प्रमाणपत्र, पदविका, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र पूर्व आणि १० + २ स्तरीय कौशल्य आधारित व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम देऊ करून विद्यार्थ्यांमध्ये ऊर्ध्वगामी गतिशीलतेस चालना देणे आणि लाभदायक रोजगार व उद्योजकता निर्माण करणाच्या दृष्टीने युवकांना तयार करणे;

(१७) पूर्व अध्ययनाला मान्यता देण्याकरिता यंत्रणा व सुविधा देऊ करणे;

(१८) चर्चासत्रे, परिषदा, कार्यकारी शिक्षण कार्यक्रम, सामूहिक विकास कार्यक्रम, प्रकाशने व प्रशिक्षण कार्यक्रम यांच्यामार्फत ज्ञान व कौशल्य यांचा प्रसार करणे;

(१९) शिक्षक, प्रशासक व काम करणारे व्यावसायिक यांच्यासाठी उच्च गुणवत्ता प्रशिक्षण, क्षमता बांधणी व विकास पद्धती संकल्पचित्रित करणे व देणे;

(२०) प्रवेश, नियुक्त्या, मूल्यमापन, अधिस्वीकृती, प्रशासन व वित्त या बाबींमध्ये उच्चतम पारदर्शकतेला चालना देणे व ती टिकवून ठेवणे;

(२१) शैक्षणिक संरचना, अध्ययन वेळापत्रके, यांच्या अखंड निर्मितीसाठी आणि सृजनशीलता व उद्योजकता यांचे संस्करण व संवर्धन करण्याकरिता कार्यशील व सातत्यपूर्ण मूल्यमापन प्रक्रिया यांसाठी नाविन्यपूर्ण दृष्टिकोन प्रस्थापित करणे;

(२२) अध्ययनार्थींना शिक्षण, प्रशिक्षण व अध्ययन संसाधने पुरविण्यासाठी, अद्ययावत माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर करून, जिथे शिक्षण पोचले नाही तेथे शिक्षण पोहचविण्याचे ध्येय ठेवणे;

(२३) जे शिक्षण व अध्ययन अध्यापनशास्त्र आणि पाठ्यक्रम सुपूर्दगी (संमिश्र किंवा दूरस्थ किंवा मुक्त किंवा ऑनलाईन किंवा कौशल्यपूर्ण किंवा इतर माध्यमातून) यांच्या बहुविध प्रकारांची सांगड घालते अशा अध्ययन, अध्यापन व अध्यापनशास्त्राची तरतूद करणे आणि अशा प्रकारे जेथे विकास व प्रगती करण्यासाठी विद्यार्थी, अनुभवी अध्यापक व उद्योग क्षेत्रातील व्यक्ती एकत्र येतील, अशा एका "आभासी प्रांगणाची" तरतूद करणे;

(२४) बाजारातील गरजांनुरूप अनुभवाधिष्ठित प्रशिक्षण, व्यावसायिक व कौशल्य आधारित प्रशिक्षण यांवर भर दिलेल्या अध्यापन, अध्ययन व अध्यापनशास्त्राची तरतूद करणे;

(२५) विद्यार्थ्यांच्या लाभासाठी संयुक्त कार्यक्रम किंवा पाठ्यक्रम देऊ करण्यासाठी किंवा अध्यापक किंवा माहिती यांचे आदानप्रदान करण्यासाठी किंवा सर्वोत्तम पद्धतींची देवाण-घेवाण करण्यासाठी आणि संसाधने किंवा अनुदाने देण्यासाठी किंवा मिळण्यासाठी अथवा सल्ला देण्यासाठी भारतातील इतर राज्यातील किंवा परकीय देशांतील इतर लौकिक प्राप्त परिसंस्था, उद्योग, व्यवसाय किंवा प्रयोगशाळा किंवा अभिकरणे किंवा संघटना यांच्याशी सहयोग करणे;

(२६) शैक्षणिक, कौशल्य व संलग्न कार्यक्रम हाती घेऊन, आणि उद्योग, सार्वजनिक संघटना, अभिकरणे व सार्वत्रिक समाज यांना व्यावसायिक व विकास सेवा पुरवून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनणे;

(२७) मंडळामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी तसेच इतर विद्यार्थी, अभिकरणे, प्रशिक्षण पुरवठादार, परिसंस्था, उद्योग व संघटना यांच्याकरिता कौशल्य मूल्यनिर्धारण कार्य हाती घेणे;

(२८) कौशल्यविषयक मूल्यनिर्धारण, ऑनलाईन मूल्यनिर्धारण, संगणकीकृत मूल्यनिर्धारण किंवा चाचण्या यांच्या अध्यापनशास्त्रातील संशोधन करणे आणि मूल्यनिर्धारण करण्यासाठी किंवा चाचण्या घेण्यासाठी आवश्यक असलेले सॉफ्टवेअर, हार्डवेअर उपाय किंवा इतर पद्धती व प्रक्रिया विकसित करणे;

(२९) एकविसाव्या शतकातील व्यक्तींसाठी व समाजासाठी अध्ययन, अध्यापन, संशोधन, मूल्यमापन, विकसन, संघटन यांचे नियमन व व्यवस्थापन करण्यासाठी आणि सामाजिक-आर्थिक संपत्तीची निर्मिती करण्यासाठी आधुनिक प्रक्रिया, यंत्रणा व तंत्रज्ञान यांचा वापर करणे;

(३०) सेवांतर्गत प्रशिक्षण केंद्रे, कार्यशाळा यांची स्थापना करण्यातून औद्योगिक व औद्योगिक संघांच्या सहभागास आणि प्रशासन, अभ्यासक्रम निर्मिती व विकास, शिक्षक प्रशिक्षण, कौशल्य प्रशिक्षण, कामावरील प्रत्यक्ष प्रशिक्षण, अन्तर्वासिता, शिकाऊ उमेदवारी, पदयोजना, सल्ला, संयुक्त प्रकल्प, कौशल्य निर्धारण प्रमाणन, इत्यादींसारख्या सर्व घटकांमधील सक्रिय सहभागाला प्रोत्साहन देणे;

(३१) विद्यार्थी सेवा देणे आणि व्यवसाय शिक्षणाचा व कौशल्य प्रशिक्षणाचा प्रसार करणे सुलभ होण्यासाठी राज्यातील विविध ठिकाणी कौशल्य केंद्रे, समूह केंद्रे, माहिती केंद्रे, चाचणी किंवा मूल्यनिर्धारण व परीक्षा केंद्रे, इत्यादींची स्थापना करणे;

(३२) व्यवसाय शिक्षण व कौशल्यविषयक गरजा समजून घेण्याच्या आणि त्यानुसार कार्यक्रम देण्याच्या दृष्टीने, विविध मंत्रालये, राज्य संस्था, विभाग, अभिकरणे किंवा राज्य, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरील इतर सांविधिक संस्था यांच्याशी संपर्क ठेवणे किंवा सहयोग करणे;

(३३) मंडळाचे कार्य प्रभावीरीत्या करण्यासाठी कोणतीही मालमत्ता, त्यातील हितसंबंध किंवा हक्क संपादित करणे, धारण करणे, हस्तांतरित करणे व तिची विल्हेवाट लावणे आणि तिचे व्यवस्थापन करणे व तिच्या संबंधात कार्यवाही करणे;

(३४) मंडळाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आणि त्यांना चालना देण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट असेल अशी कारवाई करणे;

(३५) पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाध्या यांचा दर्जा, भारतातील सांविधिक विनियामक प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मानकांपेक्षा कमी असणार नाहीत याची सुनिश्चिती करणे; आणि

(३६) शासनाद्वारे विहित करण्यात येतील अशी इतर कोणतीही उद्दिष्टे साध्य करणे.

**७. संचालकाची नियुक्ती व पदावधी आणि सेवेच्या शर्ती.-** (१) मंडळाचा एक संचालक असेल आणि व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण सह संचालकांमधून किंवा त्याच्याशी समतुल्य किंवा त्यापेक्षा उच्च पदावरील अधिका-यांमधून शासन त्याची नियुक्ती करील आणि शासनाद्वारे त्याचे नाव, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करण्यात येईल.

(२) संचालक, त्याचे नाव, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करील.

(३) पोट-कलम (२) मधील कोणत्याही गोष्टींमुळे, लोकसेवेच्या निकडीच्या वेळी, संचालकाची, अशा पदावधीत शासनाच्या अंतर्गत असलेल्या इतर कोणत्याही पदावर बदली करण्याच्या शासनाच्या अधिकारास बाधा येणार नाही; आणि जर, संचालक, शासनाच्या सेवेतून नियत वयोमानाने निवृत्त झाला असेल तर, त्याची सेवा वाढविण्यात आली नसेल किंवा त्याची शासनाच्या सेवेत फेरनेमणूक करण्यात आली नसेल आणि त्याची इतर एखाद्या पदावर बदली करण्यात आली नसेल तर, तो, संचालक असण्याचे बंद होईल.

(४) शासनास, मंडळाच्या संचालकाचा पदावधी, वेळोवेळी वाढवता येईल, तथापि, असा एकूण कालावधी, दहा वर्षांहून अधिक असणार नाही.

(५) संचालक हा, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या सह संचालकाच्या पदाशी समतुल्य दर्जाचा शासनाचा कर्मचारी असेल आणि संचालकाच्या सेवेच्या इतर शर्ती आणि सेवा प्रवेशाचे नियम, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या सहसंचालकाप्रमाणेच असतील.

(६) जेव्हा रजा, आजारपण किंवा इतर कारणामुळे संचालकाचे पद तात्पुरते रिक्त होईल त्या बाबतीत, शासनाला, दुस-या व्यक्तीची संचालक म्हणून नियुक्ती करता येईल.

**८. मंडळाच्या सदस्यांचा पदावधी व त्यांचे भत्ते.-** (१) मंडळाच्या पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त अन्य सदस्य, ज्या दिनांकास त्यांची नावे, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केली जातील त्या दिनांकापासून पाच वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करतील.

(२) मावळत्या सदस्याचा पदावधी, ज्या दिनांकास त्याच्या उत्तराधिका-यांची नावे, **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील त्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिनांकापर्यंत वाढविण्यात येईल व त्या दिनांकास समाप्त होईल.

(३) पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त अन्य सदस्य, विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येतील असे पूरक भत्ते मिळण्यास हक्कदार असतील.

**९. नियामक परिषदेची स्थापना.-** (१) शासन, राज्य स्तरावरील कौशल्य विकास, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांचे पदविका व प्रमाणपत्र स्तरावरील पाठ्यक्रम, मूल्यनिर्धारण व परीक्षा यांच्याशी संबंधित असणा-या बाबींचे नियंत्रण व संनियंत्रण करणारे शिखर मंडळ असेल अशा नियामक परिषदेची, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, स्थापना करील.

(२) नियामक परिषद, पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल:-

(क) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री, अध्यक्ष;

महाराष्ट्र शासन,

(ख) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता राज्य मंत्री, उपाध्यक्ष;
महाराष्ट्र शासन,

(ग) सचिव, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, सदस्य;
महाराष्ट्र शासन

(घ) सचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन किंवा उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली त्याची नामनिर्देशित व्यक्ती, सदस्य;

(ङ) सचिव, उद्योग विभाग, महाराष्ट्र शासन किंवा उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली त्याची नामनिर्देशित व्यक्ती, सदस्य;

(च) सचिव, कामगार विभाग, महाराष्ट्र शासन किंवा उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली त्याची नामनिर्देशित व्यक्ती, सदस्य;

(छ) सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन किंवा उपसचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली त्याची नामनिर्देशित व्यक्ती, सदस्य;

(ज) सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन किंवा उपसचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली त्याची नामनिर्देशित व्यक्ती, सदस्य;

(झ) आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, महाराष्ट्र राज्य,. कोकण भवन, नवी मुंबई, सदस्य;

(ञ) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, सदस्य;

(ट) शासनाने उद्योग क्षेत्रातून नामनिर्देशित केलेले तीन सदस्य, सदस्य;

(ठ) संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, सदस्य-सचिव.

(३) नियामक परिषदेच्या पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त, ज्यांना वेळोवेळी, सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात आलेले आहे अशा व्यक्तींची नावे, शासनाकडून **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करण्यात येतील.

(४) नियामक परिषदेच्या नामनिर्देशित सदस्याचा पदावधी, राज्य शासनाकडून त्यांना आधीच पदावरून काढून टाकले नसेल तर, पाच वर्षांच्या कालावधीसाठी असेल.

(५) नियामक परिषद, प्रत्येक वर्षी, दोनपेक्षा कमी नसतील, इतक्या बैठका घेईल, आणि लागोपाठच्या दोन बैठकींच्या दरम्यान सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी असणार नाही.

(६) नामनिर्देशित सदस्यांना, बैठकीस उपस्थित राहण्याकरिता किंवा सदस्य म्हणून अन्य कोणतीही कामे पार पाडण्याकरिता येणारा वैयक्तिक खर्च भागविण्यासाठी, शासन निर्धारित करील असे भत्ते मिळतील.

**१०. मंडळाचा किंवा नियामक परिषदेचा किंवा कोणत्याही समितीचा अध्यक्ष व सदस्य यांची निरर्हता.-** एखादी व्यक्ती ही, मंडळाचा किंवा नियामक परिषदेचा किंवा या अधिनियमान्वये नेमलेल्या कोणत्याही समितीचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून नेमली जाण्यास किंवा नामनिर्देशित केली जाण्यास किंवा असा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास पुढील कारणावरून निरर्ह ठरेल,-

(क) जर तिचा, मंडळाच्या आदेशाने केलेल्या कोणत्याही कामात, किंवा मंडळाच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत स्वतःचा किंवा तिच्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल तर;

(ख) जर कलम १३ अन्वये जिच्या विरुद्ध पदावरून काढून टाकण्याचा आदेश देण्यात आला आहे, अशी ती व्यक्ती असेल तर:

परंतु, जिच्याविरुद्ध असा आदेश देण्यात आला असेल ती व्यक्ती, जर तिला पदावरून काढून टाकण्यात आल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांचा किंवा शासन विनिर्दिष्ट करील असा त्याहून कमी कालावधी लोटलेला असेल तर, या खंडान्वये निरर्ह असल्याचे मानण्यात येणार नाही.

**११. नैमित्तिक रिक्त पदे.-** मंडळाच्या, नियामक परिषदेच्या किंवा मंडळाने घटत केलेल्या कोणत्याही समितीच्या सदस्यांची सर्व नैमित्तिक रिक्त पदे, ती रिक्त झाल्याबरोबर नामनिर्देशनाद्वारे, किंवा यथास्थिति, नेमणुकीद्वारे भरण्यात येतील; आणि त्या रिक्त पदावर नामनिर्देशित किंवा नेमणूक केलेली व्यक्ती, ज्या सदस्याच्या जागी तिला नामनिर्देशित केली असेल किंवा नेमणूक केली असेल त्या सदस्याचे पद रिक्त झाले नसते तर, त्याने जोपर्यंत पद धारण केले असते तोपर्यंतच केवळ पद धारण करील.

**१२. सदस्याचा राजीनामा.-** मंडळाच्या व नियामक परिषदेच्या पदसिद्ध सदस्याखेरीज अन्य सदस्यास, मंडळाच्या अध्यक्षाकडे, किंवा यथास्थिति, नियामक परिषदेच्या अध्यक्षाकडे लेखी राजीनामा देऊन कोणत्याही वेळी आपल्या पदाचा राजीनामा देता येईल; आणि मंडळाच्या अध्यक्षास, किंवा यथास्थिति, नियामक परिषदेच्या अध्यक्षास त्याचा राजीनामा मिळाल्याबरोबर, अशा सदस्याने आपले पद रिक्त केले आहे असे मानण्यात येईल.

**१३. सदस्यास काढून टाकणे.-** (१) शासनास, मंडळाच्या शिफारशीवरून आणि त्यास करणे योग्य वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर, आदेशाद्वारे, मंडळाच्या किंवा त्याच्या कोणत्याही समितीच्या कोणत्याही सदस्यास, जर असा सदस्य, —

(क) नैतिक अधःपतन अंतर्भूत असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल भारतातील न्यायालयाकडून सिद्धापराध ठरविला गेला असेल तर; किंवा

(ख) अमुक्त नादार असेल तर; किंवा

(ग) शासन विनिर्दिष्ट करील अशा वैद्यकीय प्राधिकरणाने त्याला शारीरिकदृष्ट्या विकलांग म्हणून घोषित केले असेल तर; किंवा

(घ) तो विकल मनाचा असून, सक्षम न्यायालयाने तो तसा असल्याचे घोषित केले असेल तर;

किंवा

(ङ) मंडळाच्या ध्येयांना व उद्दिष्टांना हानिकारक ठरेल अशा रीतीने वागत असेल तर,
अशा रीतीने काढून टाकता येईल:

परंतु, अशी शिफारस का करण्यात येऊ नये किंवा असा आदेश का काढण्यात येऊ नये याचे कारण दर्शवण्याची वाजवी संधी त्याला देण्यात आल्याशिवाय मंडळ, अशी कोणतीही शिफारस करणार नाही किंवा खंड (ङ) अन्वये कोणताही आदेश काढणार नाही.

(२) शासनाला, त्याच्या मते, मंडळाच्या किंवा कोणत्याही समितीच्या नामनिर्देशित केलेल्या किंवा नेमलेल्या ज्या कोणत्याही सदस्याच्या कृती, मंडळाचे किंवा त्याच्या कोणत्याही समितीचे कामकाज योग्यप्रकारे चालविण्यास हानिकारक असतील किंवा त्यात अडथळा करत असतील, त्या सदस्यास, आदेशाद्वारे, स्वतः होऊन काढून टाकता येईल

परंतु, कोणत्याही सदस्याला, त्याच्याविरुद्ध असा आदेश का काढण्यात येऊ नये याचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी त्याला देण्यात आल्याशिवाय, पदावरून काढून टाकण्यात येणार नाही.

(३) पोट-कलमे (१) व (२) यात काहीही अंतर्भूत असले तरी, मंडळाचा नामनिर्देशित सदस्य, शासनाची मर्जी असेपर्यंत पद धारण करील व शासनास योग्य वाटेल तर, शासन, कोणत्याही वेळी त्यास पदावरून काढून टाकील.

**१४. मंडळाच्या बैठका.-** (१) मंडळ, प्रत्येक वर्षी, दोन पेक्षा कमी नसतील इतक्या बैठका घेईल, आणि लागोपाठच्या दोन बैठकांच्या दरम्यान सहा महिन्यांपेक्षा अधिक अंतर असणार नाही.

(२) मंडळाच्या अध्यक्षास, निकडीच्या कारणामुळे तशी आवश्यकता वाटल्यास, कोणत्याही वेळी मंडळाची विशेष बैठक बोलावता येईल, आणि मंडळाच्या एकूण सदस्यांपैकी एक-तृतीयांशापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी लेखी विनंती केल्यावर, अध्यक्ष, त्यास अशी विनंती मिळाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवासांपेक्षा नंतरचा नसेल अशा दिनांकास मंडळाची विशेष बैठक बोलावील.

**१५. अपात्र ठरवल्यामुळे अध्यक्षाचे किंवा सदस्याचे पद रिक्त होणे.-** जर मंडळाचा किंवा कोणत्याही समितीचा अध्यक्ष किंवा सदस्य, कलम १० मध्ये नमूद केलेल्या निरर्हतांपैकी कोणत्याही निरर्हतेच्या अधीन झाला असेल तर, त्यानंतर, त्याचे पद रिक्त झाल्याचे शासनाद्वारे जाहीर करण्यात येईल.

**१६. परवानगीशिवाय अनुपस्थित राहिल्यामुळे सदस्याचे पद रिक्त होणे.-** नामनिर्देशित केलेला किंवा नेमलेला मंडळाचा सदस्य, मंडळाच्या परवानगीशिवाय, मंडळाच्या लागोपाठच्या तीन बैठकींना अनुपस्थित राहिला असेल तर, त्यानंतर, त्याचे पद रिक्त होईल आणि तसे रिक्त झाल्याचे अध्यक्षाद्वारे जाहीर करण्यात येईल.

**१७. रिक्त पदासंबंधीच्या प्रश्नावरील निर्णय.-** अध्यक्षाचे किंवा सदस्याचे पद, कलम १५ किंवा १६ अन्वये रिक्त झाले आहे किंवा कसे, यासंबंधी कोणताही विवाद उद्‍भवल्यास, तो विवाद शासनाकडे निर्दिष्ट करण्यात येईल व त्यावरील शासनाचा निर्णय अंतिम असेल.

**१८. मंडळाच्या किंवा नियामक परिषदेच्या किंवा समित्यांच्या रिक्त पदांमुळे किंवा रचनेतील दोषांमुळे कृती किंवा कार्यवाही विधिअग्राह्य न ठरणे.-** मंडळाची किंवा नियामक परिषदेची किंवा कोणत्याही समित्यांची कोणतीही कृती किंवा कार्यवाही, अशा मंडळामध्ये किंवा नियामक परिषदेमध्ये किंवा समित्यांमध्ये कोणतेही पद रिक्त होते किंवा अशा मंडळाच्या किंवा नियामक परिषदेच्या किंवा समित्यांच्या रचनेत दोष होता केवळ याच कारणावरून विधिअग्राह्य ठरणार नाही.

**१९. तज्ज्ञांना व अधिकाऱ्यांना बैठकीस बोलावण्याचा अधिकार.-** मंडळास, त्याच्या मते, जी व्यक्ती व्यावसायिक शिक्षण, प्रशिक्षण, कौशल्य विकास व उद्योजकता या क्षेत्रांतील किंवा इतर कोणत्याही संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ असेल अशा कोणत्याही व्यक्तीस किंवा शासनाच्या कोणत्याही अधिका-यास, ती तज्ज्ञ व्यक्ती किंवा तो अधिकारी ज्या विषयाशी संबंधित असेल तो विषय जर मंडळाच्या किंवा त्याच्या समित्यांच्या बैठकीमध्ये चर्चेसाठी किंवा विचारार्थ मांडला जाण्याचा संभव असेल तर, त्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी निमंत्रित करता येईल.

**२०. समित्यांची रचना.-**

(१) मंडळ, पुढील समित्या घटित करील:—

(क) विद्वत समिती;

(ख) वित्त समिती;

(ग) क्षेत्रीय कौशल्य समित्या;

(घ) मूल्यांकन, परीक्षा व प्रमाणन समिती;

(ङ) अधिस्वीकृती, संलग्नीकरण व समतुल्यता समिती.

(२) मंडळ, त्यांची कार्ये कार्यक्षमरित्या पार पाडण्याकरिता त्यास आवश्यक वाटेल, अशा इतर समित्या घटित करील.

(३) मंडळाने घटित केलेल्या प्रत्येक समितीच्या सदस्यांची संख्या, त्यांच्या सदस्यांचा पदावधी व अशा समित्यांनी पार पाडावयाची कर्तव्ये व कार्ये, विनियमांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

**२१. मंडळाचे शासकीय अधिकारी व कर्मचारी.-** (१) विद्यमान मंडळाचे स्थायी कर्मचारी हे, मंडळाच्या सेवेत कायम असतील आणि या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या विनियमांच्या तरतुदींना अधीन असतील:

परंतु, —

(क) अशा नोकरीच्या कालावधीमध्ये उक्त मंडळाच्या कर्मचा-यांचे वेतन, रजा, सेवानिवृत्ती, भत्ते, निवृत्तीवेतन, भविष्यनिर्वाह निधी व सेवेच्या इतर शर्ती यांच्याशी संबंधित असणा-या सर्व बाबी, महाराष्ट्र नागरी सेवा नियमांद्वारे किंवा शासनाने, वेळोवेळी केलेल्या अशा इतर नियमांद्वारे, विनियमित करण्यात येतील;

(ख) अशा कोणत्याही कर्मचा-यास, सेवेतून नाकारण्याचा, बडतर्फ करण्याचा किंवा काढून टाकण्याचा आदेश, दंड किंवा इतर कोणतीही शिक्षा या विरुद्ध शासनाकडे अपील करण्याचा हक्क असेल.

(२) विद्यमान मंडळाचे स्थायी कर्मचारी, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या कोणत्याही कार्यालयांमध्ये किंवा परिसंस्थेमध्ये, संबंधित संवर्गाअंतर्गत, जेथे रिक्त पदे अस्तित्वात असतील तेथे, बदलीस पात्र असतील.

(३) विद्यमान मंडळावर कंत्राटी तत्त्वावर नियुक्त केलेले कर्मचारी, ज्या शर्तीवर त्यांना नियुक्त केले होते त्याच शर्तीना अधीन राहून राहतील.

(४) विद्यमान मंडळाच्या कोणत्याही प्रयोजनांच्या संबंधात, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी विद्यमान मंडळाने जो केला असेल असा सर्व खर्च, त्या दिनांकाला कलम ४१ अन्वये मंडळास शासनाकडून भांडवली खर्चापोटी दिलेली आगाऊ रक्कम असल्याचे मानण्यात येईल, आणि अशा खर्चातून संपादित केलेल्या सर्व मत्ता, मंडळाकडे निहित असतील.

**२२. मंडळाचा सचिव व अधिकारी यांची नियुक्ती, अधिकार व कर्तव्ये.-** (१) मंडळाचा एक सचिव असेल, त्याची नियुक्ती शासन करील.

(२) सचिव, संचालकाच्या नियंत्रणास अधीन राहून, मंडळाचा कार्यकारी अधिकारी असेल, आणि त्या त्या वेळी मंडळाच्या अंतर्गत सेवा करीत असलेले इतर सर्व अधिकारी व कर्मचारी हे सचिवास दुय्यम असतील.

(३) सचिव, नियामक परिषदेच्या व मंडळाच्या बैठकींना हजर राहण्यास हक्कदार असेल आणि तो, मंडळाचा सदस्य-सचिव असेल.

(४) मंडळाने केलेल्या किंवा मंडळाविरुद्ध केलेल्या सर्व दाव्यांमध्ये किंवा इतर कायदेशीर कार्यवाहींमध्ये, वादकथनांवर, मंडळाच्या सचिवाद्वारे सही करण्यात येईल व ती सत्यापित करण्यात येईल आणि अशा दाव्यांतील व कार्यवाहींमधील सर्व आदेशिका मंडळाच्या सचिवाला काढण्यात येतील व त्याच्यावर बजावण्यात येतील.

(५) सचिव, विनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

(६) शासन, मंडळाच्या शिफारशींवरून, मंडळासाठी आवश्यक त्या संख्येतील सहसचिव, उपसचिव, सहायक सचिव, निरीक्षक, परीक्षा नियंत्रक, यांसारख्या तांत्रिक कर्मचारीवर्गाची आणि प्रशासकीय अधिकारी व लेखा अधिकारी यांसारख्या इतर कर्मचारीवर्गाची नियुक्ती करील.

(७) पोट-कलम (६) अन्वये नियुक्त केलेले कर्मचारी, याबाबतीत काढलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशान्वये सचिवाद्वारे अनुक्रमे, त्यांना नेमून दिल्या जातील अशा सचिवाच्या अधिकारांचा वापर करतील व अशी कर्तव्ये पार पाडतील.

(८) पोट-कलम (६) मध्ये विनिर्दिष्ट केलेले कर्मचारी हे, शासनाचे कर्मचारी असतील, आणि त्यांचे वेतन व भत्ते शासनाच्या एकत्रित निधीतून प्रदान करण्यात येतील आणि त्या अधिका-यांच्या व कर्मचा-यांच्या सेवेच्या इतर शर्ती शासनाद्वारे निर्धारित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

**२३. मंडळाचे इतर अधिकारी व कर्मचारी.-** (१) मंडळास, शासनाच्या मान्यतेने या अधिनियमाखालील त्याची कार्ये सक्षम रीतीने पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील असे इतर अधिकारी व कर्मचारी नियुक्त करता येतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती, मंडळ विनियमांद्वारे निर्धारित करील त्याप्रमाणे असतील.

## प्रकरण तीन

## **नियामक परिषदेचे व मंडळाचे अधिकार व कर्तव्ये**

**२४. नियामक परिषदेचे अधिकार व कर्तव्ये.-** या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, नियामक परिषदेचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील:-

(क) मंडळाने निर्दिष्ट केलेल्या बाबींवर कारवाई करणे आणि अंमलबजावणीसाठी मंडळाच्या शिफारशींना व निर्णयांना मान्यता देणे;

(ख) उद्योग समुहांशी विचारविनिमय करून, सम्यक विकास योजना तयार करणे;

(ग) कर्मचारी वर्गाचे विनियम करण्याशी व त्यांच्या मान्यतेशी संबंधित असलेल्या बाबी यांना मान्यता देणे;

(घ) मंडळाच्या लेख्यांची चाचणी लेखापरीक्षा, नियमितपणे आणि नियामक परिषदेला योग्य वाटेल अशा कालांतराने करण्याची शासनाला शिफारस करणे;

(ङ) परिसंस्थांचे अधिस्वीकृती धोरण ठरविणे;

(च) मंडळाने निर्दिष्ट केलेल्या वित्तीय बाबींशी संबंधित असणा-या अधिकारांचा वापर करणे;

(छ) मंडळाने शिफारस केलेल्या अर्थसंकल्पाला मान्यता देणे;

(ज) शासनाने वेळोवेळी घेतलेल्या विविध धोरणात्मक निर्णयांच्या अंमलबजावणीच्या संबंधात मंडळाला निदेश देणे;

(झ) मंडळाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांची नियुक्ती यांसह सेवेच्या अटी व शर्ती, त्यांच्या अर्हता, वर्तणूक, शिस्त व कर्तव्ये, सेवा भरतीचे मार्ग व वेतनमान, इत्यादीसंबंधीचे नियम व कार्यपद्धती यांना मान्यता देणे;

(ञ) मंडळाच्या अंतर्गत असलेल्या परिसंस्थांचे योग्य प्रचालन, कामकाज व वित्तव्यवस्था यांच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीच्या संबंधात चौकशी करण्याची शासनाला शिफारस करणे.

**२५. मंडळाचे अधिकार व कर्तव्ये.-** या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, मंडळाचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतोल:-

(१) ज्या क्षेत्रामध्ये भविष्यात नोक-या निर्माण होणार आहेत अशा स्वयंचलित्र, वस्त्र व फर्निचर, गालिचे इत्यादी, विमानचालन व अंतरिक्षयान, प्रसार माध्यम व मनोरंजन, चित्रपट, भांडवली वस्तू, दळणवळण, संकल्पचित्रण, तंत्रज्ञान, व्यवस्थापन व उद्योजकता, व्यवसाय, बँकिंग व विमा, आरोग्य सेवा, आदरातिथ्य, माल

वाहतूक, क्रीडा, प्रवास व पर्यटन, जीवनशास्त्रे, उपयोजित व सृजनशील कला, मानव्यविद्या, विदा शास्त्र व कृत्रिम बुद्धिमत्ता, ई-व्यवसाय, किरकोळ विक्री, विश्लेषणे, कृषी व्यवसाय, ४.० उद्योगांशी संबंधित असलेले उद्योग व रोजगार क्षमता असलेली कौशल्ये देण्यासह अन्य कोणतीही अभ्यास क्षेत्रे यांसारख्या आघाडीच्या नवनवीन उदयोन्मुख क्षेत्रांसह कौशल्याच्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये व्यावसायिक शिक्षणाची व प्रशिक्षणाची सुविधा पुरविणे आणि त्यास चालना देणे;

(२) राष्ट्रीय कौशल्य अर्हता आराखड्याद्वारे विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे किंवा मंडळाद्वारे निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे, राष्ट्रीय व्यावसायिक मानकांनुसार विविध पातळ्यांकरिता अभ्यासक्रम संच व श्रेयांक आराखडे विकसित करणे;

(३) मंडळाला योग्य वाटेल त्याप्रमाणे, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, कौशल्य शिक्षण, अध्यापन व शिक्षण, श्रेयांक आराखडा व अभ्यासक्रम संच यांच्याशी सुसंगत असलेली मानके व मानदंड निश्चित करणे;

(४) प्रवेश परीक्षा, मूल्यमापन किंवा चाचणीच्या किंवा मंडळाकडून निश्चित करण्यात येतील अशा इतर कोणत्याही पद्धती यांचा समावेश असेल, अशी मंडळाच्या पाठ्यक्रमांच्या प्रवेशाची मानके निर्धारित करणे;

(५) सुरक्षा ठेव, संलग्नता, नाव नोंदणी, सल्ला, स्वायत्तता प्रदान करणे, सममूल्यता देणे यांसह मूल्यनिर्धारण व परीक्षा आणि इतर सेवा यांसाठी आणि मंडळाने पुरविलेल्या सल्लाविषयक सेवांसाठी, मंडळास योग्य वाटेल असे शुल्क व शास्ती आणि इतर आकार निर्धारित करणे, विनिर्दिष्ट करणे, आणि विद्यार्थी व इतर कोणतीही व्यक्ती, संस्था, उद्योग किंवा निगम निकाय यांच्याकडून त्याचे प्रदान स्वीकारणे;

(६) ज्ञान प्रसार व कौशल्य प्रशिक्षण यांसाठी मंडळाला योग्य वाटेल अशा आणि त्याच्या उद्दिष्टांशी सुसंगत असतील अशा कौशल्य व संलग्न क्षेत्रांमधील श्रेयांक आराखडा व अभ्यासक्रम संच यांनुसार, शिक्षणाचे सुलभीकरण करणे;

(७) मंडळाची अंतिम परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर, शासनाच्या वतीने उमेदवारांना पदविका, प्रमाणपत्रे, व यथास्थिति, इतर विशेषोपाध्या प्रदान करणे;

(८) त्याच्याशी संलग्न असलेल्या, कौशल्य शिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिसंस्थांमधील परीक्षेचे किंवा विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचे व क्षमतेचे मूल्यनिर्धारण करण्याच्या इतर कोणत्याही मापदंडाची अथवा प्रवेशाची मानके निश्चित करणे;

(९) परीक्षा घेणे अथवा ज्ञानाची किंवा क्षमतेची इतर निर्धारणे, अथवा मंडळ, वेळोवेळी निर्धारित करील त्याप्रमाणे त्यांच्याशी संलग्न असलेल्या इतर मूल्य निर्धारण पद्धती स्वीकारणे;

(१०) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण आणि कौशल्य शिक्षण परिसंस्था, प्रशिक्षण आस्थापना, उद्योग आस्थापना, सामूहिक केंद्रे, मूल्यनिर्धारण संस्था व कौशल्य विकास केंद्रे यांना, मंडळाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने व अशा मापदंडानुसार संलग्नता व मान्यता देणे;

(११) मंडळाद्वारे निर्धारित केलेल्या रीतीने परिसंस्थेला स्वायत्त दर्जा प्रदान करणे;

(१२) कौशल्यांमधील विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक प्रशिक्षणाच्या प्रयोजनांसाठी उद्योग, कंपन्या, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय भागीदार यांना मान्यता देणे, आणि श्रेयांक मिळवण्याच्या प्रयोजनासाठी उद्योगामधील अशा प्रात्यक्षिक प्रशिक्षणामध्ये एखाद्या विद्यार्थ्याने प्राप्त केलेल्या क्षमतेच्या मान्यतेची मानके निश्चित करणे;

(१३) प्रमाणपत्र व पदविका स्तरावरील परीक्षा यांसाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, कौशल्य विकास व उद्योजकता शिक्षण देणा-या सर्व परिसंस्थांना परवानगी देण्याची शासनाकडे शिफारस करणे;

(१४) कामातील किंवा उद्योगामधील संबंधित अनुभवावर आधारित असलेल्या कौशल्यांमधील पूर्व अध्ययन व क्षमतेच्या मान्यतेचे मूल्यनिर्धारण करण्याची मानके व मापदंड निश्चित करणे आणि श्रेयांक आराखड्यानुसार, अशा पूर्व अध्ययनासाठी किंवा क्षमतेसाठी श्रेयांक नेमून देणे आणि पूर्व अध्ययनाच्या मान्यतेसाठी प्रमाणपत्र प्रदान करणे;

(१५) सत्र पद्धती, निरंतर मूल्यमापन व श्रेयांक हस्तांतरणास सहाय्यभूत असणारी पसंतीवर आधारित असलेली श्रेयांक पद्धती आणि इतर शैक्षणिक परिसंस्था यांच्याबरोबर संयुक्त पदविका किंवा दुहेरी पदविका कार्यक्रम सुरू करणे;

(१६) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, कौशल्य विकास व उद्योजकता शिक्षण यांतील संमिश्र किंवा दूरस्थ किंवा मुक्त अथवा ऑनलाईन पाठ्यक्रम सुरू करणे;

(१७) विहित करण्यात येतील अशा मानकांनुसार किंवा त्यांच्या अभावी, मंडळाद्वारे निर्धारित करण्यात येतील अशा मानकांनुसार, कौशल्य प्रशिक्षकांच्या व प्रशिक्षण परिसंस्थांच्या मूल्यनिर्धारण प्रमाणनाचे व अधिस्वीकृतीचे मापदंड निर्धारित करणे;

(१८) शासनाच्या पूर्व मान्यतेने, प्रशासकीय व इतर तांत्रिक पदे निर्माण करणे आणि त्यांच्या नियुक्त्या करणे;

(१९) भविष्यात आवश्यक असतील अशा कौशल्यविषयक गरजांचे मूल्यनिर्धारण करण्याकरिता असे अध्ययन हाती घेणे किंवा हाती घेण्याची व्यवस्था करणे आणि उदयोन्मुख रोजगार बाजाराच्या संदर्भातील, किंवा यथास्थिति, संलग्न परिसंस्थांकडून दिलेल्या किंवा देण्याचे प्रस्तावित केलेल्या शिक्षणाच्या संबंधातील कौशल्यविषयक मूल्यनिर्धारणाची आणि आवश्यकतांची आधारसामग्री तयार करणे व तिचे परिरक्षण करणे;

(२०) कौशल्य शिक्षणाची उच्च शिक्षणाशी सांगड घालण्यासाठी संयुक्त पदविका कार्यक्रम सुरू करताना, राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाच्या इतर कोणत्याही विद्यापीठाशी किंवा परिसंस्थेशी सहयोग करणे;

(२१) जागतिक दर्जाची क्षमता, ज्ञान व योग्यता विकसित करण्याच्या प्रयोजनासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिसंस्थांशी आंतरराष्ट्रीय सहयोग करण्यास चालना देणे आणि शासनाच्या पूर्वपरवानगीने संयुक्त प्रमाणपत्र व पदविका प्रदान करणे;

(२२) सर्वसाधारणपणे, केंद्र सरकारच्या व राज्य शासनाच्या प्रमाणपत्र व पदविका स्तरावरील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, कौशल्य विकास व उद्योजकता कार्यक्रम यांच्याशी संबंधित असणा-या धोरणविषयक बाबींवर आणि विशेषकरून पुढील बाबींवर शासनाला सल्ला देणे:-

(क) प्रमाणपत्र व पदविका स्तरावरील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, कौशल्य विकास व उद्योजकता शिक्षण यांतील राष्ट्रीय धोरणे व राज्य धोरणे यांमध्ये समन्वय साधणे;

(ख) राष्ट्रीय कौशल्य विकास अभिकरण, राष्ट्रीय व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिषद आणि राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ यांच्यामध्ये राष्ट्रीय कौशल्य अर्हता आराखड्याबाबत समन्वय साधणे;

(ग) धोरणांच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिषदेशी समन्वय साधणे;

(घ) माध्यमिक, उच्च माध्यमिक व विद्यापीठ प्रमाणपत्र स्तरीय, पदविका स्तरीय व पदवी स्तरीय व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, कौशल्य विकास व उद्योजकता शिक्षण यांच्यामध्ये समन्वय साधणे;

(ङ) प्रमाणपत्र व पदविका स्तरावरील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांचा एकरुप दर्जा राखणे;

(च) प्रमाणन व मूल्यनिर्धारण करण्यासाठी उद्योग संस्थांशी सुसंवाद साधण्याची मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करणे;

(२३) अभ्यासक्रम व पाठ्यक्रम निश्चित करण्याची मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करणे आणि तसेच नियमित, प्रशिक्षणाची दुहेरी पद्धत, अंशकालिक, पत्रव्यवहार पाठ्यक्रम, वार्षिक, सत्र पद्धतीवर आधारित पाठ्यक्रम व तत्सम यांसारख्या सर्व प्रवर्गांकरिता प्रमाणपत्र व पदविका स्तरावरील व्यवसाय शिक्षणाचा व प्रशिक्षणाचा तपशीलवार अभ्यासक्रम व पाठ्यक्रम तयार करणे;

(२४) प्रमाणपत्र व पदविका स्तरावरील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण पाठ्यक्रम यांच्यासाठी पाठ्यपुस्तक व संदर्भ पुस्तक किंवा इतर कोणतेही अध्ययन साहित्य म्हणून - मग ते वर्ग, ऑनलाईन किंवा प्रात्यक्षिक प्रशिक्षण यांच्यासाठी आवश्यक असो,- कोणतेही पुस्तक विहित करणे आणि विकसित करणे, किंवा कोणतीही पुस्तके व मुद्रित किंवा अमुद्रित साहित्य तयार करणे किंवा तयार करण्याची व्यवस्था करणे, किंवा प्रत्यक्षपणे किंवा इतर कोणत्याही एजन्सीच्या सहयोगाने कोणत्याही प्रकारचे अध्ययन साहित्य प्रकाशित करणे किंवा तयार करणे;

(२५) मंडळाच्या मान्यताप्राप्त पाठ्यक्रमांचे ऑनलाईन शिक्षण, प्रशिक्षण व परीक्षा आणि मूल्यनिर्धारण यांचे व्यवस्थापन व नियमन करण्याबाबत उद्योगांच्या सहयोगाने तंत्रज्ञानात्मक उपाययोजना व सेवा विकसित करणे;

(२६) भारतातील किंवा भारताबाहेरील कोणत्याही एजन्सीच्या सहयोगाने, अभ्यासक्रम, अध्यापन अध्ययन प्रक्रिया आणि परीक्षा यांचे संकल्पचित्रण, विकास, अंमलबजावणी व मूल्यांकन करण्याच्या प्रयोजनार्थ, सांख्यिकीय व अन्य संशोधन किंवा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे;

(२७) मान्यता किंवा संलग्नता या प्रयोजनार्थ, शासकीय किंवा अशासकीय संघटनेच्या विशिष्ट हेतूने (टेलर मेड) सानुकूल केलेल्या पाठ्यक्रमांना मान्यता देणे;

(२८) विद्यार्थ्यांना सर्व स्तरांवर बहुप्रवेश -निर्गमन व श्रेयांक अधिकोषण (क्रेडीट बँकींग) आणि स्थानांतर सुविधा पुरविणा-या कौशल्य विकास अध्यापनशास्त्राच्या धर्तीवर पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धतीची शिफारस करणे;

(२९) संलग्नता व अधिस्वीकृती यांसाठी मूलभूत सुविधांच्या व इतर प्रमाणकांच्या बाबतीत परिसंस्थांसाठी प्रमाणित शर्ती (आवश्यकता) विहित करणे आणि त्याचे विनियमन करणे;

(३०) विद्याविषयक दर्जा राखला जात असल्याची खात्री करण्यासाठी त्याने मान्यता दिलेल्या परिसंस्थेकडून कोणतीही माहिती मागविणे, त्याने मान्यता दिलेल्या परंतु आवश्यक विद्याविषयक दर्जा न राखणा-या प्रमाणपत्र व पदविका स्तरावरील परिसंस्थांच्या संबंधात, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयांच्या जिल्हास्तरिय कार्यालयांकडून विशेष अहवाल व माहिती मागविणे आणि तिची मान्यता काढून घेण्याची नियामक परिषदेला शिफारस करणे आणि मान्यता काढून घेण्याच्या किंवा अशा परिसंस्थेविरुध्द शिफारस केलेली कारवाई करण्याच्या संबंधात, नियामक परिषदेच्या निदेशांनुसार कार्यवाही करण्यात येईल;

(३१) मंडळाने मान्यता दिलेल्या परिसंस्थांना, परीक्षा घेण्यात त्यांचे सहकार्य देण्यासाठी फर्मावणे आणि ज्या परिसंस्था, परीक्षा घेण्यासाठी आवश्यक असलेल्या सुविधा मंडळाकडे सोपवण्याबाबत कसूर करतील, अशा कोणत्याही परिसंस्थांना, आदेश काढण्यापूर्वी, त्यांना बाजू मांडण्यांची वाजवी संधी दिल्यानंतर, त्यांचे विशेष अधिकार काढून घेणे;

(३२) नियमित उमेदवारांच्या, माजी उमेदवारांच्या आणि बहिस्थ उमेदवारांच्या परीक्षेच्या प्रवेशाचे नियमन करणा-या सर्वसाधारण शर्ती विहित करणे, आणि ज्यांची पूर्तता केल्यावर उमेदवाराला अशा कोणत्याही परीक्षेसाठी प्रवेश मिळण्याचा आणि त्या परीक्षेला बसण्याचा हक्क प्राप्त होईल त्या पात्रता, उपस्थिती व सत्रातील काम विनिर्दिष्ट करणे;

(३३) विद्यार्थी, सेवांतर्गत कर्मचारी, कार्य करणारे व्यावसायिक यांना सर्व प्रकारांचे संबंधित कौशल्ये देण्याकरिता उद्योग व समाजाच्या लाभासाठी उद्योगांच्या सहयोगाने कौशल्य विकास केंद्रांची स्थापना करणे आणि प्रशिक्षण किंवा संशोधन प्रयोजनासाठी संयुक्त प्रकल्प हाती घेणे;

(३४) विनियमांनुसार परीक्षेसाठी उमेदवारांना प्रवेश देणे, आणि परीक्षेला बसलेल्या उमेदवारांचे निकाल मंडळ निश्चित करील अशा दिनांकाला किंवा दिनांकांना जाहीर करणे;

(३५) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र पूर्व परीक्षा व १० + २ स्तरावरील, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, आर्टीझन्स-टू-टेक्नोक्रॅट योजना, राज्य शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण योजना, यांसह कौशल्य विकास कार्यक्रमांचे परीक्षण व मूल्यनिर्धारण करणे आणि विहित करण्यात येईल त्याप्रमाणे प्रमाणपत्र व पदविका स्तरावरील प्रमाणपत्रे प्रदान करणे;

(३६) मंडळाच्या शैक्षणिक कार्यक्रमांमधील त्याच किंवा वेगवेगळ्या विद्याशाखांमध्ये एकात्मीकृत पाठ्यक्रमांसाठी अशा तरतुदी करणे;

(३७) शिष्यवृत्या, अधिछात्रवृत्त्या, विद्यावेतने, पदके, बक्षिसे व इतर पारितोषिके सुरू करणे व देणे तसेच त्यांसाठी शर्ती विहित करणे;

(३८) केंद्र सरकारकडून व राज्य शासनाकडून देणग्या, अनुदाने, दान किंवा धर्मदाने स्वीकारणे आणि मृत्युपत्रकर्ते, दाते किंवा हस्तांतरक किंवा त्यामध्ये हितसंबंध असणारे, किंवा यथास्थिति, त्यांचे हक्क असणारे यांच्याकडून मृत्युपत्रितदान, दान, दाननिधी व विश्वस्तव्यवस्था स्वीकारणे आणि स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे हस्तांतरण स्वीकारणे;

(३९) वरील खंड (३८) मध्ये निर्दिष्ट केलेली कोणतीही मालमत्ता, हितसंबंध किंवा हक्क धारण करणे, आणि त्यांचे व्यवस्थापन करणे व त्यासंबंधी व्यवहार करणे;

(४०) त्याची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असेल त्याप्रमाणे मंडळ कार्यालयाच्या व जिल्हा स्तरीय कार्यालयांच्या कामकाजासाठी आवश्यक असलेली कोणतीही मालमत्ता किंवा पायाभूत सुविधा स्वतः निर्माण करणे, ती भाड्याने धारण करणे;

(४१) उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, मंडळास योग्य वाटेल त्याप्रमाणे, आवश्यक किंवा सोयीस्कर असेल अशी कोणतीही जमीन किंवा इमारत, परिवास्तू (जागा) किंवा पायाभूत सुविधा खरेदी करणे किंवा भाडेपट्ट्याने घेणे किंवा संमती-नि-परवाना या तत्त्वावर घेणे;

(४२) राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने, मंडळाच्या मालमत्तेच्या प्रतिभूतीवर मंडळाच्या प्रयोजनांसाठी पैसे उसने घेणे;

(४३) मंडळाच्या हितार्थ, मंडळाचा निधी, वेळोवेळी, अशा रोख्यांमध्ये किंवा रोख्यांवर गुंतविणे आणि कोणतीही गुंतवणूक, बँकांमध्ये हस्तांतरित करणे;

(४४) मंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या हितासाठी भविष्यनिर्वाह निधी घटित करणे;

(४५) मंडळाशी संबंधित असणा-या वार्षिक वित्तीय विवरणपत्रास मान्यता देणे आणि वार्षिक अर्थसंकल्प मंजुरीसाठी नियामक परिषदेला शिफारस करणे;

(४६) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयांच्या जिल्हास्तरिय कार्यालयाच्या मंडळाशी संबंधित असणा-या कामकाजाचे सर्वसाधारण निरीक्षण करणे व त्यावर देखरेख ठेवणे आणि त्यांच्या लेख्यांचे नियतकालिक निरीक्षण करणे;

(४७) विनियमांनुसार मंडळाच्या कर्मचारीवर्गाची नियुक्ती करणे;

(४८) या अधिनियमाखालील त्याची कामे कार्यक्षमरीतीने पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील अशा समित्यांची नेमणूक करणे;

(४९) या अधिनियमाच्या तरतुदी प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी विनियम करणे;

(५०) मंडळ, त्याच्या समित्या यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती यांसारख्या बाबी आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये केलेल्या विनियमांद्वारे जिची तरतूद केलेली नसेल अशी, मंडळ व त्याच्या समित्या यांच्याशी संबंधित असणारी इतर कोणतीही बाब, यांच्याशी संबंधित असणारे उपविधी तयार करणे;

(५१) राज्यातील प्रमाणपत्र, पदविका व प्रगत पदविका स्तरावरील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि उद्योजकता शिक्षण सुधारणे, त्याची व्याप्ती वाढवणे आणि त्याचा विस्तार करणे आणि असे प्रमाणपत्र, पदविका व प्रगत पदविका स्तरावरील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि उद्योजकता शिक्षण यांचा दर्जा राखणे व सुधारणे, यासंबंधातील या अधिनियमाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व कृती करणे;

(५२) परिसंस्था व पाठ्यक्रम यांना संलग्नता, मान्यता, सममूल्यता, पात्रता व स्वायत्तता देण्यासाठी विनियम तयार करणे;

(५३) परीक्षा घेणे, उमेदवारांच्या प्रगतीचे मूल्यनिर्धारण करणे आणि निकालांचे संकलन करणे व तो जाहीर करणे यांसाठी प्राश्निक, परीक्षक, नियामक, मूल्यनिर्धारक, पर्यवेक्षक आणि इतर आवश्यक कर्मचारीवर्ग यांची नेमणूक करणे;

(५४) मंडळाद्वारे देण्यात येणा-या मुक्त व ऑनलाईन अध्ययन कार्यक्रमांसाठी बहुविध नाव नोंदणी आवर्तने (फे-या) आयोजित करणे;

(५५) पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपाधी यांचा दर्जा हा भारतातील सांविधिक नियामक प्राधिकरणांनी निर्धारित केलेल्या दर्जापेक्षा कमी असणार नाही याची सुनिश्चिती करणे;

(५६) देशातील किंवा देशाबाहेरील संलग्न परिसंस्था, परीक्षा मंडळे, विद्यापीठे, शासकीय शैक्षणिक संस्था, संचालनालये व शासकीय विभाग, इत्यादींसह व्यवसाय शिक्षण, प्रशिक्षण, कौशल्य विकास व उद्योजकता कार्यक्रमांच्या अभिवृद्धीसाठी, सल्ला, संलग्नता व सहाय्यता सेवा पुरविणे व संपादन करणे;

(५७) राष्ट्रीय व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार किंवा मंडळ विहित करील त्याप्रमाणे राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची कार्ये पार पाडणे;

(५८) मंडळाची सर्व किंवा कोणतीही उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने आवश्यक असतील अशा सर्व कृती व गोष्टी करणे.

**२६. मंडळाच्या संचालकाचे अधिकार व कर्तव्ये.-** (१) या अधिनियमाच्या तरतुदी आणि त्याखाली केलेले विनियम व उपविधी यांचे परिणामकारकरीत्या पालन केले जात आहे याची निश्चिती करणे हे मंडळाच्या संचालकाचे कर्तव्य असेल, आणि या प्रयोजनासाठी त्याला आवश्यक ते सर्व अधिकार असतील.

(२) संचालक, शैक्षणिक कार्यक्रमांच्या विकासासाठी जबाबदार असलेला, मंडळाचा विद्याविषयक प्रमुख व मुख्य कार्यकारी अधिकारी असेल. तो, कार्यक्षमतेची व सुव्यवस्थेची सुनिश्चिती करण्यासाठी मंडळाच्या सर्वसाधारण प्रशासनाची देखरेख, संनियंत्रण व नियंत्रण करील.

(३) संचालक, मंडळाच्या कोणत्याही समितीच्या कोणत्याही बैठकीस उपस्थित राहण्यास व संबोधित करण्यास हक्कदार असेल.

(४) संचालक, शासनाने, नियामक परिषदेने व मंडळाने दिलेल्या निदेशांचे काटेकोरपणे अनुपालन किंवा यथास्थिति, अंमलबजावणी केली जात आहे याची सुनिश्चिती करील.

(५) जेव्हा कोणतीही बाब, विनियमांद्वारे किंवा उपविधींद्वारे विनियमित करणे आवश्यक असेल, परंतु, त्याबाबतीत कोणतेही विनियम किंवा उपविधी केलेले नसतील त्याबाबतीत, संचालकास, त्यास आवश्यक वाटतील असे निदेश काढून त्या वेळेसाठी ती बाब विनियमित करता येईल आणि मान्यतेसाठी पुढील बैठकीमध्ये मंडळासमोर ठेवता येईल:

परंतु, असे निदेश हे, असे निदेश काढल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत विनियमांमध्ये किंवा, यथास्थिति, उपविधींमध्ये रुपांतरित करावयाचे असून तसे करण्यास निष्फळ ठरल्यास, असे निदेश आपोआप व्यपगत होतील, परंतु त्याद्वारे केलेल्या कारवाईस बाधा येणार नाही.

(६) मंडळाच्या संचालकाच्या मते, ज्यावेळी तात्काळ कारवाई करणे आवश्यक आहे अशा निकडीच्या प्रसंगी संचालक, त्यास आवश्यक वाटेल अशी कारवाई करील आणि त्यानंतर, त्याच्या कारवाईचा अहवाल मंडळाला, त्याच्या पुढील बैठकीमध्ये सादर करील.

(७) संचालक, विनियमनांद्वारे विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील आणि अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

**२७. निदेश देण्याचे शासनाचे अधिकार.-** (१) शासनाला, कलम २५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबीसंबंधात मंडळाने दिलेला (कोणताही असल्यास) सल्ला विचारात घेतल्यानंतर, त्यास आवश्यक वाटतील असे निदेश देण्याचा अधिकार असेल. संबंधित मंडळ, अशा निदेशांचे अनुपालन करील.

(२) शासनास, मंडळाने चालविलेल्या किंवा केलेल्या किंवा मंडळ चालवित असलेल्या किंवा करीत असलेल्या किंवा चालविण्याचा किंवा करण्याचा मंडळाचा इरादा असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संदर्भात मंडळास संबोधित करण्याचा आणि त्या बाबतीतील आपली मते मंडळास कळविण्याचा हक्क असेल.

(३) मंडळ, मते कळविण्यात आल्यावर, त्याने जी करण्याची योजिलेली आहे किंवा हाती घेतलेली आहे अशी कोणतीही कारवाई शासनाला कळवील, आणि जर त्याने अशी कारवाई करण्यास कसूर केली असेल तर, त्याबाबत स्पष्टीकरण देईल.

(४) जर मंडळाने, शासनाचे समाधान होईल अशा रीतीने वाजवी अवधीत कारवाई केली नाही तर, शासनास, मंडळाने दिलेले स्पष्टीकरण किंवा केलेले अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, त्यास योग्य वाटतील असे, या अधिनियमाशी सुसंगत असे निदेश देता येतील, आणि मंडळ, अशा निदेशांचे अनुपालन करील.

(५) शासनाच्या मते, ज्यावेळी तात्काळ कारवाई करणे आवश्यक आहे अशा निकडीच्या प्रसंगी, शासनास, मंडळाशी पूर्व विचारविनिमय न करता, या अधिनियमाशी सुसंगत असणारी त्यास आवश्यक वाटेल अशी कारवाई करता येईल, आणि शासन, केलेल्या कारवाईबाबत मंडळास ताबडतोब कळवील.

(६) मंडळाचा कोणताही ठराव, आदेश किंवा कृती ही, मंडळास या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली प्रदान केलेल्या अधिकारांचा अत्याधिक वापर करून केली आहे असे शासनाचे मत असेल तर, शासनास, लेखी आदेशाद्वारे त्याची कारणे विनिर्दिष्ट करून, मंडळाचा कोणताही ठराव किंवा आदेश याची अंमलबजावणी निलंबित करता येईल आणि मंडळाने जी कारवाई करण्याचा आदेश दिला असेल किंवा तसा आदेश दिला असल्याचे अभिप्रेत असेल अशी कारवाई करण्यास प्रतिबंध करता येईल.

प्रकरण चार

## परवानगी, संलग्नता, स्वायत्त दर्जा प्रदान करणे व समतुल्यता

**२८. परवानगीच्या व संलग्नतेच्या शर्ती.-** (१) संलग्नीकरणासाठी अर्ज करणारे व्यवस्थापन आणि ज्याच्या परिसंस्थेला विनिर्दिष्ट मुदतीसाठी संलग्नता देण्यात आली आहे असे व्यवस्थापन, पुढील हमी देईल आणि तिचे अनुपालन करील,-

(क) अधिनियमाच्या तरतुदींचे आणि त्या खाली केलेल्या विनियमांचे आणि मंडळाच्या स्थायी आदेशांचे व निदेशांचे पालन करण्यात येईल;

(ख) संलग्नता दिलेल्या परिसंस्थेकरिता तरतूद केलेली एक स्वतंत्र स्थानिक व्यवस्थापन समिती असेल;

(ग) पाठ्यक्रमांसाठी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या, मंडळाने व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक नसेल;

(घ) विनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, इमारती, प्रयोगशाळा, ग्रंथालये, पुस्तके, अध्यापनासाठी व संशोधनासाठी आवश्यक असलेली साधनसामग्री व यंत्रसामग्री, वसतिगृहे, व्यायामशाळा यांसारख्या योग्य व पुरेशा भौतिक सुविधा असतील;

(ङ) परिसंस्थेची वित्तीय साधने ही, तिची नियमित देखभाल व कामकाज चालविण्यासाठी योग्य ती तरतूद करणारी असतील;

(च) संलग्नता दिलेल्या मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या अध्यापक कर्मचारी वर्गाची अर्हता, मंडळाद्वारे विहित केल्याप्रमाणे असेल आणि ती, अभ्यास पाठ्यक्रम, अध्यापन किंवा प्रशिक्षण कार्यक्षमतेने चालवण्यासाठी योग्य ती तरतूद करण्यास पुरेशी असेल;

(छ) संलग्नता द्यावयाच्या परिसंस्थेच्या सर्व अध्यापक व अध्यापकेतर कर्मचा-यांच्या सेवा आणि त्या परिसंस्थेच्या सुविधा, परीक्षा घेण्यासाठी व मूल्यनिर्धारणासाठी आणि मंडळाच्या इतर कार्यक्रमांना चालना देण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येतील;

(ज) अधिनियमाच्या तरतुदी आणि त्या खाली केलेले विनिमय या अन्वये मंडळाचे अध्यक्ष व इतर अधिकारी यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना, त्यांनी दिलेले निदेश व आदेश यांचे अनुपालन करण्यात येईल;

(झ) मंडळाच्या पूर्वपरवानगीशिवाय, व्यवस्थापनामध्ये कोणताही बदल किंवा त्याचे हस्तांतरण करण्यात येणार नाही;

(ञ) मंडळाच्या पूर्वपरवानगीशिवाय परिसंस्था बंद करण्यात येणार नाही;

(ट) कलम ३५ किंवा, यथास्थिति, ३९ याअन्वये परिसंस्थेचे संलग्नीकरण रद्द करण्यात किंवा मान्यता काढून घेण्यात आल्यास अथवा परिसंस्था बंद करण्यात आल्यास अशा प्रसंगी शासनाने

सहायक अनुदान म्हणून प्रदान केलेल्या रकमेमधून बांधण्यात किंवा निर्माण करण्यात आलेल्या, परिसंस्थेच्या इमारती व साधनसामग्री यांसह परिसंस्थेच्या सर्व मत्ता शासनाकडे निहित होतील.

(२) जी परिसंस्था दुस-या मंडळाचा भाग आहे अशी परिसंस्था, मूळ मंडळाकडून "ना हरकत प्रमाणपत्र" मिळाल्याशिवाय संलग्नीकरण करण्यासाठी विचारात घेतली जाणार नाही.

**२९. परवानगी संबंधीची कार्यपद्धती.-** (१) नवीन परिसंस्था सुरू करण्यासाठी परवानगी मागणारे व्यवस्थापन, मंडळाने वेळोवेळी घोषित केलेल्या वेळापत्रकानुसार मंडळाच्या सदस्य सचिवाकडे विहित नमुन्यात अर्ज करील.

(२) उपरोक्त विहित कालमर्यादेत मिळालेल्या अशा सर्व अर्जांची, मंडळाने घटित केलेल्या समितीद्वारे छाननी व प्रत्यक्ष तपासणी करण्यात येईल आणि ते अर्ज, शासनाकडे पाठवण्यात येतील.

(३) शासन, मंडळाने शिफारस केलेल्या अर्जांपैकी, त्यांना नवीन परिसंस्था सुरू करण्याची परवानगी मागणा-या व्यवस्थापनांची सुयोग्यता आणि व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, कौशल्य विकास व उद्योजकता शिक्षणाच्या परिसंस्थांच्या स्थानासंबंधातील राज्यस्तरीय प्राधान्यक्रम या आधारावर, त्याच्या निरपवाद स्वेच्छानिर्णयानुसार त्याला उचित व योग्य वाटतील त्यांना परवानगी देऊ शकेल:

परंतु, अपवादात्मक प्रकरणांमध्ये आणि कारणे लेखी नमूद करून, शासन, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, कौशल्य विकास व उद्योजकता शिक्षणाच्या नवीन परिसंस्था सुरू करण्यासाठी आलेल्या, मंडळाने शिफारस न केलेल्या अशा कोणत्याही अर्जाला मान्यता देऊ शकेल.

(४) कोणतीही नवीन परिसंस्था सुरू करण्याची परवानगी मिळण्यासाठी आलेला कोणताही अर्ज, शासन, थेट दाखल करून घेणार नाही.

**३०. संलग्नीकरणाची कार्यपद्धती.-** (१) कलम २९ अन्वये शासनाकडून परवानगी मिळाल्यावर, मंडळ, पोट-कलम (२) मध्ये दिलेल्या विहित कार्यपद्धतीचे अनुसरण करून आणि परिसंस्थेकडून कराराननिविष्ट शर्तीचे पालन करण्यात आलेले आहे किंवा कसे आणि कोणत्या मर्यादेपर्यंत पालन करण्यात आलेले आहे ते विचारात घेतल्यानंतर, नवीन परिसंस्थेला पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणास मंजुरी देण्याबाबत विचार करील. या संबंधातील मंडळाचा निर्णय अंतिम असेल.

(२) संलग्नीकरणास मंजुरी मिळण्याबाबतचा अर्ज विचारात घेण्यासाठी, मंडळ, त्याने या प्रयोजनासाठी घटित केलेल्या समितीद्वारे चौकशी करण्याची व्यवस्था करील.

(३) मंडळ, पुढील बाबतीत निर्णय घेईल:-

(क) संलग्नीकरण मंजूर करावे किंवा नाकारावे किंवा कसे;

(ख) संलग्नीकरणास पूर्णतः किंवा अंशतः मंजुरी द्यावी किंवा कसे;

(ग) विषय, अभ्यास पाठ्यक्रम व प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या;

(घ) संलग्नीकरणास मंजुरी देताना, करारनिविष्ट करता येतील अशा शर्ती, कोणत्याही असल्यास.

(४) सदस्य-सचिव, मंडळाचा निर्णय, शासनाच्या प्रतीसह परिसंस्थेच्या व्यवस्थापनास कळवील आणि जर संलग्नीकरणाचा अर्ज मंजूर केला असेल तर, पुढील माहितीसह कळवील:-

(क) संलग्नीकरणासाठी मान्यता दिलेले विषय व अभ्यास पाठ्यक्रम;

(ख) प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या;

(ग) ज्या शर्तींची पूर्तता करण्यास अधीन राहून, मान्यता दिलेली आहे अशा शर्ती, कोणत्याही असल्यास.

(५) कलम २९ मध्ये निर्दिष्ट केलेली कार्यपद्धती, योग्य त्या फेरफारांसह, नवीन पाठ्यक्रम, जादा पाठ्यक्रम, नवीन विषय व जादा तुकड्या सुरू करण्याच्या परवानगीसाठी लागू असेल.

(६) मंडळाकडून परिसंस्थेला पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणास मंजुरी देण्यात आल्याखेरीज, परिसंस्थेकडून कोणत्याही विद्यार्थ्याला प्रवेश देण्यात येणार नाही.

(७) पोट-कलमे (१) ते (४) मध्ये निर्दिष्ट केलेली कार्यपद्धती, योग्य त्या फेरफारांसह, वेळोवेळी, संलग्नीकरण चालू ठेवण्याचा विचार करण्यासाठी लागू होईल.

**३१. संलग्नीकरण चालू ठेवणे.-** संलग्न परिसंस्थेस, ज्याच्यासाठी संलग्नीकरणास मंजुरी देण्यात आली होती त्या अभ्यास पाठ्यक्रमांचे संलग्नीकरण पुढे चालू ठेवण्यासाठी, अशा संलग्नीकरणाच्या समाप्तीच्या तारखेपूर्वी साधारणपणे सहा महिने अगोदर अर्ज करता येईल. मंडळ, कलमे २८, २९ व ३० यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीचे, ती जेथवर संलग्नीकरण मंजूर करण्यासाठी लागू असेल तेथवर, पालन करील.

**३२. संलग्नीकरण वाढविणे.-** संलग्न परिसंस्थेस, जादा अभ्यास पाठ्यक्रमांकरिता संलग्नीकरणासाठी अर्ज करता येईल. मंडळ, कलमे २८, २९ व ३० यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीचे, ती जेथवर संलग्नीकरण मंजूर करण्यासाठी लागू असेल तेथवर, पालन करील.

**३३. कायमस्वरूपी संलग्नीकरण व मान्यता.-** संलग्न परिसंस्था म्हणून कमीतकमी सहा वर्षे कार्यरत असणा-या संलग्न परिसंस्थेला, कायमस्वरुपी संलग्नीकरणासाठी अर्ज करता येईल. मंडळ, अर्जावर विचार करील आणि त्याची छाननी करील आणि जर संलग्न परिसंस्था, संलग्नीकरणाच्या सर्व शर्ती समाधानकारकपणे पूर्ण करीत आहे याबद्दल आणि मंडळाने वेळोवेळी विहित केलेला उच्च विद्याविषयक व प्रशासकीय दर्जा तिने प्राप्त केलेला आहे याबद्दल मंडळाची खात्री पटली तर, त्या परिसंस्थेला कायमस्वरुपी संलग्नीकरण देईल.

**३४. परिसंस्थेची तपासणी व अहवाल.-** (१) परिसंस्थेचा विद्याविषयक दर्जा व विद्याविषयक प्रशासनाचा दर्जा याबाबत निर्णय घेणे मंडळाला शक्य व्हावे म्हणून मंडळ फर्मावील असे अहवाल, विवरणे व इतर तपशील प्रत्येक संलग्न परिसंस्था सादर करील.

(२) संचालक, प्रत्येक संलग्न परिसंस्थेची त्या बाबतीत त्याने नियुक्त केलेल्या एका किंवा अधिक समित्यांकडून प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये तपासणी करण्याची व्यवस्था करील.

**३५. संलग्नीकरण किंवा मान्यता काढून घेणे.-** (१) जर संलग्न परिसंस्था, कलम २८ मध्ये तरतूद केलेल्या संलग्नीकरणाच्या शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर करील तर, मंडळ, संलग्नीकरणाद्वारे परिसंस्थेस प्रदान

केलेले विशेषाधिकार, अंशतः किंवा संपूर्णतः का काढून घेण्यात येऊ नयेत अथवा त्यात फेरबदल का करण्यात येऊ नयेत याबाबतची कारणे दाखवा नोटीस व्यवस्थापनाला पाठवू शकेल.

(२) मंडळ, उपरोल्लिखित कारवाई करण्याचे त्याने का प्रस्तावित केले आहे याबद्दलची कारणे नमूद करील आणि नोटीशीची एक प्रत परिसंस्थेच्या प्राचार्यास किंवा प्रमुखास पाठवील. मंडळ, नोटीशीच्या उत्तरादाखल व्यवस्थापनाने ज्या मुदतीत आपले लेखी निवेदन सादर केले पाहिजे ती, तीस दिवसांपेक्षा कमी असणार नाही अशी मुदतही त्या नोटीशीत विनिर्दिष्ट करील.

(३) असे निवेदन मिळाल्यावर किंवा पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या नोटीशीमध्ये विनिर्दिष्ट केलेली मुदत संपल्यावर मंडळ, असे विशेषाधिकार काढून घेण्याची किंवा त्यात फेरबदल करण्याची योग्य ती कारवाई करील.

(४) मंडळ, परिसंस्थेमध्ये शिकत असणा-या विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन, याबाबतीत हाती घ्यावयाच्या कारवाईची, शासनाकडे शिफारस करील आणि त्यानंतर, शासन त्या शिफारशींची अंमलबजावणी करील.

**३६. स्वायत्त दर्जा प्रदान करणे.-** (१) विद्याविषयक स्वायत्त दर्जाकरिता आपण पात्र आहोत असे समजणारी मान्यताप्राप्त परिसंस्था, ज्या वर्षापासून विद्याविषयक स्वायत्त दर्जा मिळण्यासाठी अर्ज करावयाचा असेल त्या वर्षाच्या ३१ ऑगस्ट रोजी किंवा त्यापूर्वी, मंडळाने विहित केलेल्या नमुन्यामध्ये मंडळाच्या सचिवाकडे अर्ज करील.

(२) सचिव, विद्याविषक समितीपुढे अर्ज ठेवील आणि विद्याविषयक समिती अर्जाची छाननी करील आणि असा अर्ज विचारात घेण्यासाठी सकृतदर्शनी प्रकरण आहे किंवा कसे, याचा निर्णय करील. जर अर्जास सकृतदर्शनी प्रकरण आहे असा निर्णय विद्याविषयक समितीने घेतला तर, परिसंस्थेचा प्रमुख, कर्मचारीवर्ग व विद्यार्थी यांच्याशी चर्चा करून त्याद्वारे स्थानिक चौकशी करील.

(३) स्थानिक चौकशी, निकषांच्या मुद्यांवर आणि मानके व दर्जा यांनुसार सुविधा अस्तित्वात आहेत किंवा कसे आणि जेथे जेथे विनिर्दिष्ट केले असेल तेथे परिसंस्थेने किमान आवश्यक अधिस्वीकृती व पुरेशा वित्तीय क्षमता, इत्यादी प्राप्त केलेल्या आहेत किंवा कसे हे निर्धारित करण्यासाठी आणि समितीला आवश्यक वाटेल अशा अधिक माहितीसाठी, करण्यात येईल.

(४) मंडळाचा सचिव, अर्ज व अर्जाची छाननी आणि स्थानिक चौकशी करण्यासाठी विद्याविषयक समितीचा अहवाल, मंडळासमोर त्याच्या बैठकीमध्ये सादर करील, मंडळ, तो अहवाल स्वीकारण्यात यावा किंवा फेटाळण्यात यावा किंवा कसे ते नमूद करून ठराव संमत करील. जर मंडळाने बहुमताने किंवा एकमताने अर्ज व अहवाल फेटाळला आणि स्वायत्त दर्जा प्रदान करण्याची शिफारस न करण्याचा निर्णय घेतला तर, ते, त्याची कारणे नोंदवील. जर मंडळाने अर्ज मंजूर करण्याचे प्रस्तावित केले आणि विद्याविषयक स्वायत्त दर्जा प्रदान करण्याची शिफारस केली तर, ते तशा अर्थाचा ठराव संमत करील आणि ज्या शर्तींच्या अधीन राहून विद्याविषयक स्वायत्त दर्जा प्रदान करण्यात येईल त्या शर्ती विनिर्दिष्ट करील.

(५) मंडळाचा सचिव, ठरावाची प्रत आणि मंडळ ठरवील असे इतर अभिलेख यांसह मंडळाच्या अशा शिफारशी, शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या सचिवास, एका महिन्याच्या कालावधीत मान्यतेसाठी, सादर करील.

(६) अर्ज करणा-या परिसंस्थेला विद्याविषयक स्वायत्त दर्जा प्रदान करण्यासाठी शासनाकडून मान्यता मिळाल्यावर, मंडळाचा सचिव, संबंधित परिसंस्थेला, शर्तीसह, कोणत्याही असल्यास, ही बाब लेखी कळवील.

(७) विद्याविषयक स्वायत्त दर्जा प्रदान करण्याचा नकार देखील संबंधित परिसंस्थेला कळवावयाचा आहे.

स्वायत्तता प्रदान करण्याकरिता अर्ज आल्याच्या शेवटच्या दिनांकापासून दहा महिन्यांच्या आत पोट-कलमे (१) ते (७) मधील कार्यवाही पूर्ण करावयाची आहे.

(८) केंद्र व राज्य शासन यांनी विद्याविषयक स्वायत्त दर्जाबाबत वेळोवेळी तरतूद केलेली कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे, नियम, विनियम, इत्यादी, विद्याविषयक स्वायत्त दर्जा मागणा-या परिसंस्थेला आणि जिला विद्याविषयक स्वायतत्ता अगोदरच दिलेली आहे अशा परिसंस्थांना लागू होतील.

**३७. समतुल्यता व पात्रता.-** (१) विद्याविषयक स्वायत्त दर्जा मंजूर केलेल्या परिसंस्थांनी, त्यांच्या पाठ्यक्रमांसाठी व कार्यक्रमांसाठी मंडळाकडून समतुल्यता मिळविणे आवश्यक असेल.

(२) स्वायत्त परिसंस्था, त्यांचे अभ्यासक्रम, अध्यापन व परीक्षा योजना मंडळाकडून वेळोवेळी मान्य करून घेतील.

(३) मंडळ, अशा स्वायत्त परिसंस्थांचे प्रत्येक वर्षी निरीक्षण करील.

(४) मंडळ, स्वायत्त परिसंस्थांचे, अभ्यासक्रम, अध्यापन व परीक्षा योजना, शिकवण्याचे तास, शैक्षणिक वेळापत्रक, परीक्षेला बसण्यासाठी उमेदवाराची पात्रता व मूल्यनिर्धारण, इत्यादींसारख्या सर्व शैक्षणिक, मूल्यनिर्धारण व परीक्षेशी संबंधित सर्व कार्याचे संनियंत्रण करील.

(५) स्वायत्त परिसंस्थांचे नियामक मंडळ व इतर समित्या यांवर, मंडळाचे प्रतिनिधी असतील.

(६) मंडळ, रोजगाराच्या प्रयोजनार्थ, कोणत्याही प्रमाणपत्राला, पदविकेला, पदविकोत्तर पदविकेला, प्रगत पदविकेला किंवा महाराष्ट्रात, महाराष्ट्राबाहेर किंवा भारताबाहेर असलेल्या कोणत्याही तत्सम मंडळाच्या किंवा विद्यापीठाच्या किंवा कोणत्याही परीक्षा प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील कोणत्याही शासकीय मान्यताप्राप्त परिसंस्थेने चालवलेल्या अशा कोणत्याही कार्यक्रमाला, अभ्यासक्रमाची छाननी करून त्या आधारे समतुल्यता प्रदान करील.

(७) मंडळ, कोणतेही प्रमाणपत्र, पदविका, प्रगत पदविका, किंवा मंडळ चालवत असलेला असा कोणताही कार्यक्रम यांसाठी आवश्यक असेल त्या त्या वेळी भारतातील किंवा भारताबाहेरील कोणत्याही तत्सम मंडळाकडून, महाविद्यालयाकडून, विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही परीक्षा प्राधिकरणाकडून समतुल्यता मिळवील.

(८) मंडळ, कोणत्याही पाठ्यक्रमास किंवा कार्यक्रमास, देण्यात आलेल्या समतुल्यतेच्या आधारावर पात्रता प्रमाणपत्र देईल.

**३८. स्वायत्त दर्जा काढून घेणे.-** मंडळाची, तक्रार प्राप्त झाल्यावर किंवा स्वाधिकारे, चौकशी केल्यानंतर आणि कारणे दाखवा नोटीस बजावून म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, स्वायत्तता दिलेल्या परिसंस्थेने, कलमे ३५ व ३६ यांमध्ये तरतूद केलेल्या शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केली आहे आणि मंडळाने, वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे उच्च विद्याविषयक व प्रशासकीय दर्जा प्राप्त करण्यात कसूर केली आहे अशी खात्री पटली असेल तर, ते, परिसंस्थेचा स्वायत्त दर्जा काढून घेण्याची शिफारस शासनाला करील आणि त्यावरील शासनाचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

**३९. परिसंस्था बंद करणे.-** (१) शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय, कोणत्याही परिसंस्थेच्या व्यवस्थापनाला, परिसंस्था बंद करण्याची अनुमती देण्यात येणार नाही.

(२) अशा परिसंस्थांचे अध्यापक व अध्यापकेतर कर्मचारीवर्ग यांसह व त्यांच्याशी संबंधित असलेली सर्व प्रकारची दायित्वे, वित्तीय किंवा अन्यथा, चुकती करण्याची सर्वस्वी जबाबदारी परिसंस्था बंद करू इच्छिणा-या व्यवस्थापनाची असेल आणि शासन किंवा मंडळ, कोणत्याही टप्प्यावर अशा जबाबदारीसाठी पात्र असणार नाही.

(३) परिसंस्था बंद करू इच्छिणारे व्यवस्थापन, आधीच्या वर्षाच्या एप्रिल महिन्याच्या शेवटच्या दिवशी किंवा त्यापूर्वी, परिसंस्था बंद करण्यासंबंधीची सर्व कारणे नमूद करून आणि इमारती व साधनसामग्री यांच्या रुपात असलेल्या मत्ता, त्यांची मूळ किंमत, प्रचलित बाजारमूल्य आणि त्यास शासनाकडून किंवा सार्वजनिक वित्त पुरवठा संस्थांकडून त्यावेळेपर्यंत मिळालेली अनुदाने यांचा निर्देश करून, मंडळाकडे अर्ज करील.

(४) असा अर्ज मिळाल्यावर, ती परिसंस्था बंद करण्यास परवानगी देण्यात यावी किंवा कसे याचे मूल्यनिर्धारण करण्यासाठी व ठरविण्यासाठी मंडळ, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी करण्याची व्यवस्था करील. आवश्यक ते सहाय्य देऊन किंवा शासनाद्वारे परिसंस्था ताब्यात घेऊन किंवा ती अन्य व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करून परिसंस्था बंद करण्याचे टाळण्यात यावे किंवा कसे याची मंडळास तपासणी करता येईल.

(५) जर मंडळाने परिसंस्था बंद करण्याची शिफारस करण्याचे ठरविल्यास, ते, व्यवस्थापनाकडून वसूल करावयाच्या नुकसानभरपाईचे किंवा भरपाईचे प्रमाण, शासनाने किंवा इतर सार्वजनिक वित्त पुरवठा एजन्सींनी पुरविलेल्या निधीचा वापर करून निर्माण केलेल्या मत्ता शासनाकडे किंवा इतर व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करण्यात याव्यात किंवा कसे आणि कपात केलेले अध्यापक व कर्मचारीवर्ग यांना प्रदान करावयाची भरपाई याबाबतचा अहवाल तयार करील व तो शासनाला सादर करील.

(६) मंडळाने, संलग्न परिसंस्था बंद करण्याची शिफारस केली असेल तर, शासनास, परिसंस्था बंद करण्याचा आदेश काढता येईल.

(७) जर शासनाने, ती संस्था ताब्यात घेण्याचे किंवा अन्य व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करण्याचे ठरविले तर, शासन विहित करील अशा कार्यपद्धतीचे अनुसरण करण्यात येईल.

(८) परिसंस्थेत आधीच प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये या दृष्टीने परिसंस्था बंद करण्याची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने करण्यात येईल आणि पहिल्या वर्षाचे वर्ग प्रथम बंद करण्यात येतील आणि

कोणालाही नव्याने प्रवेश दिला जाणार नाही. परिसंस्था टप्प्याटप्याने बंद करण्याची प्रक्रिया शासन विहित करील त्याप्रमाणे असेल.

प्रकरण पाच

## निधी, वित्तव्यवस्था, लेखा व लेखापरीक्षा

**४०. मंडळाच्या मत्तांचा वापर.-** मंडळाकडे निहित असलेली सर्व मालमत्ता, निधी व इतर मत्ता, या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून व या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, मंडळाकडून धारण करण्यात येईल व वापरण्यात येईल.

**४१. मंडळाचा निधी, त्याची अभिरक्षा व त्याची गुंतवणूक.-** (१) मंडळाचा, स्वतःचा असा एक निधी असेल आणि त्यात पुढील रकमा जमा करण्यात येतील, -

(क) मंडळाने आकारलेल्या व जमा केलेल्या शास्तीसह फी, स्वामित्वधन व आकार;

(ख) मंडळास, शासनाने किंवा अन्यथा दिलेली कोणतीही अनुदाने, रोख अनुदाने, अंशदाने व वित्तीय सहाय्य, कोणतेही असल्यास;

(ग) कोणतीही मृत्युपत्रित दाने, देणग्या व दाननिधी किंवा इतर अंशदाने, कोणतीही असल्यास;

(घ) मंडळामध्ये निहित असलेल्या कोणत्याही कर्जरोख्यांवरील व्याज व लाभांश, आणि त्यांच्या विक्रीचे उत्पन्न;

(ङ) मंडळामध्ये निहित असलेल्या मालमत्तेपासून मिळणारे सर्व भाडे व नफा;

(च) मंडळास किंवा त्याच्या वतीने मिळालेला इतर पैसा.

(२) मंडळ, पुढील निधी स्थापन करील:-

(क) सर्वसाधारण निधी;

(ख) वेतन निधी,-

(एक) राज्य शासनाने मान्यता दिलेल्या सर्व पदांकरिता;

(दोन) स्वतंत्ररित्या इतर सर्व पदांकरिता;

(ग) विश्वस्त निधी;

(घ) विकास व कार्यक्रम निधी;

(ङ) आकस्मिकता निधी.

(३) मंडळाच्या मते, जो स्थापन करणे आवश्यक वाटेल असा इतर कोणताही निधी. अशा निधीची स्थापना व विनियोग, विनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(४) पुढील रकमा, सर्वसाधारण निधीचा भाग असतील, किंवा त्यामध्ये त्यांचा भरणा करण्यात येईल,—

(क) राज्य शासनाकडून किंवा केंद्र सरकारकडून प्राप्त झालेले वेतनेतर अंशदान किंवा अनुदान किंवा कंपनी अधिनियम, २०१३ (२०१३ चा १८) खालील निगम सामाजिक दायित्त्व निधी;

(ख) शुल्क, इतर शुल्क व आकार यांमधून मिळणा-या उत्पन्नासह, अन्य कोणत्याही मार्गाने मंडळाला मिळणारे सर्व उत्पन्न;

(ग) शासनाच्या परवानगीने बँकांकडून किंवा अन्य कोणत्याही अभिकरणाकडून कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमा;

(घ) अन्य कोणत्याही मार्गाने किंवा अभिकरणाकडून मिळालेल्या रकमा.

(५) वेतन निधीमध्ये, राज्य शासनाकडून, केंद्र सरकारकडून प्राप्त झालेल्या सर्व रकमांचा किंवा वेतन व भत्ते यांच्या पूर्णतः किंवा अंशतः प्रदानापोटी प्राप्त झालेल्या इतर कोणत्याही दाननधीचा किंवा अंशदानाचा समावेश असेल. वेतने व भत्ते प्रदान करण्याच्या प्रयोजनांव्यतिरिक्त अन्य प्रयोजनांसाठी या निधीमधील कोणत्याही रकमेचा वापर करण्यात येणार नाही.

(६) विश्वस्तव्यवस्था, मृत्युपत्रित दान, देणग्या, स्थायी दाने, रोख अनुदाने व तत्सम अनुदाने यांपासून मिळणारे सर्व उत्पन्न किंवा पैसा हा विश्वस्तव्यवस्था निधीचा भाग असेल.

(७) (क) मंडळाच्या विकास व कार्यक्रम निधीमध्ये, राज्य शासनाकडून मिळालेली सर्व पायाभूत विकास अनुदाने, उद्योग, बँका व वित्तीय संस्था किंवा कोणतीही व्यक्ती किंवा संस्था यांनी दिलेली सर्व अंशदाने यांचा समावेश असेल;

(ख) या निधीमधील कोणत्याही रकमेचे, मंडळाच्या इतर कोणत्याही निधीसाठी विनियोजन करण्यात येणार नाही किंवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी तो खर्च करण्यात येणार नाही;

(ग) विकास व कार्यक्रम निधीचा, नियामक परिषदेने मंजूर करावयाचा व मान्यता द्यावयाचा खर्च व लेखापरीक्षा याबाबतच्या, कार्यक्रमांच्या उद्दिष्टांशी सुसंगत असेल अशा रीतीने व वित्तपुरवठा करणा-या एजन्सीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, विनियोग करण्यात येईल.

(८) मंडळाचा, मंडळाच्या लेख्यांच्या स्वतंत्र शीर्षाखाली एक आकस्मिकता निधी असेल व ते, तो ठेवील आणि कोणताही अकल्पित खर्च भागविण्याच्या प्रयोजनासाठीच केवळ त्याचा वापर करण्यात येईल.

(९) उपरोक्त प्रयोजनांसाठी, जिचा ताबडतोब किंवा नजीकच्या कोणत्याही दिनांकाला वापर केला जाऊ शकत नसेल अशी, या निधीच्या जमाखाती असलेली अतिरिक्त रक्कम, त्यातून उपार्जित होणा-या रकमांसह वेळोवेळी राष्ट्रीयीकृत किंवा अनुसूचित बँकांमध्ये जमा करण्यात येईल अथवा राज्य शासनाचा ज्यात वित्तीय सहभाग आहे अशा महामंडळाच्या इतर कोणत्याही समभागांमध्ये किंवा रोख्यांमध्ये गुंतवण्यात येईल.

(१०) मंडळाला, त्याच्या निधीपैकी विहित करण्यात येईल अशी रक्कम, भारतीय स्टेट बँकेकडे किंवा बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ (१९४९ चा १०) याच्या कलम २२ अन्वये भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेले लायसन धारण करणा-या भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या कोणत्याही अनुसूचित बँकेकडे चालू किंवा ठेव खात्यात ठेवता येईल आणि उक्त रकमेपेक्षा अधिक असलेली कोणतीही रक्कम शासन मान्यता देईल अशा रीतीने गुंतवण्यात येईल.

(११) मंडळाद्वारे किंवा याबाबत केलेल्या विनियमांद्वारे प्राधिकृत करण्यात येतील अशा मंडळाच्या अधिका-यांकडून अशा खात्यावर व्यवहार करण्यात येईल.

**४२. निधीचा सर्वसाधारण वापर.-** या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, मंडळाच्या निधीचा वापर, या अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या बाबींशी संबंधित असलेला आकार व खर्च देण्यासाठी आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये मंडळाला ज्या प्रयोजनासाठी अधिकार प्रदान करण्यात आले असतील व मंडळावर कर्तव्ये सोपवण्यात आली असतील अशा इतर कोणत्याही प्रयोजनांसाठीच केवळ करण्यात येईल.

**४३. निधीतून रक्कम काढण्याची रीत.-** मंडळाने, याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिका-याने सही केलेल्या धनादेशाशिवाय किंवा पतपत्राशिवाय बँक, मंडळाच्या निधीमधून कोणतीही रक्कम देणार नाही.

**४४. जिल्हा कार्यालयांना व परिसंस्थेला नियत वाटप.-** मंडळ, मंडळाने त्याच्या अधिकारितेतील कामे किंवा विकास परियोजना पूर्ण करण्यासाठी जिल्हा कार्यालयांवर व परिसंस्थेवर लादलेली कर्तव्ये व कामे पार पाडणे त्यांना शक्य व्हावे म्हणून मंडळ निर्धारित करील अशा रकमा, प्रत्येक जिल्हा कार्यालयांना व परिसंस्थांना वेळोवेळी देईल.

**४५. वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करणे.-** (१) मंडळ, विनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा तारखेपूर्वी आणि अशा रीतीने, पुढील वित्तीय वर्षाच्या मंडळाच्या उत्पन्न व खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करील.

(२) मंडळ, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा त्यानंतर, त्याने तयार केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार करील आणि त्याने मान्य केल्याप्रमाणे ते शासनास मान्यतेसाठी सादर करील. शासनास, अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाच्या संदर्भात, त्यास योग्य वाटतील असे आदेश काढता येतील, आणि ते मंडळाला कळवता येतील. मंडळ, ते आदेश अंमलात आणील.

(३) मंडळाचे वित्तीय वर्ष, राज्य शासनाप्रमाणेच असेल.

**४६. वार्षिक लेखे व लेखा परीक्षण.-** (१) मंडळ, नियामक परिषदेने मान्य केलेल्या वित्तीय विनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा पद्धतीने लेखे ठेवील.

(२) मंडळाने नियुक्त केलेल्या लेखा परीक्षकांकडून मंडळाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्यात येईल.

(३) शासनास, आवश्यक वाटले तर, मंडळाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्यासाठी विशेष लेखापरीक्षक नेमता येईल.

(४) लेखापरीक्षक किंवा, यथास्थिति, विशेष लेखापरीक्षक, त्याचा अहवाल मंडळास सादर करील व त्याची एक प्रत नियामक परिषदेकडे अग्रेषित करील.

(५) पोट-कलम (२) किंवा (३) अन्वये लेखापरीक्षणाचा खर्च, कोणताही असल्यास, मंडळ भागवेल.

**४७. निरीक्षण व चौकशी.-** (१) शासनास, मंडळाचे, मंडळाशी संलग्न असलेल्या कोणत्याही परिसंस्थेच्या इमारती, वसतिगृहे, प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि साधनसामग्री यांचे, अशा कोणत्याही परिसंस्थेने केलेल्या अध्यापनाचे किंवा इतर कामाचे आणि मंडळाच्या वतीने घेतलेल्या कोणत्याही परीक्षेच्या आणि

मूल्यनिर्धारणाच्या संचालनाचे, शासन निदेश देईल अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून निरीक्षण करविण्याचा आणि मंडळाने केलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात तशाच रीतीने चौकशी करविण्याचा हक्क असेल.

(२) शासन, प्रत्येक प्रकरणी, निरीक्षण किंवा चौकशी करविण्याच्या आपल्या इराद्याची मंडळाला रीतसर सूचना देईल आणि ज्यास अशा निरीक्षणाच्या किंवा चौकशीच्या वेळी हजर राहण्यासाठी आणि बाजू मांडण्यासाठी मंडळाकडून प्राधिकृत केले जाते अशा एका प्रतिनिधीची नियुक्ती करण्यास मंडळ हक्कदार असेल.

(३) शासन, अशा निरीक्षणाच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षाच्या संबंधात आपले विचार मंडळाला कळवील आणि त्यावरील मंडळाचे मत अजमाविल्यानंतर, करावयाच्या कारवाईबद्दल त्याला सल्ला देऊ शकेल आणि अशी कारवाई करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करू शकेल.

(४) निरीक्षणाच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षाबाबत मंडळाने केलेल्या किंवा करण्याचे प्रस्तावित केलेल्या, कोणत्याही असल्यास, अशा कारवाईचा अहवाल शासनास कळवील. असा अहवाल त्यावरील मंडळाच्या मतासह, शासन निदेश देईल अशा वेळेत सादर करण्यात येईल.

(५) जेव्हा निश्चित केलेल्या वेळेच्या आत, शासनाचे समाधान होईल अशी कारवाई मंडळाने केली नसेल त्याबाबतीत, शासनास, मंडळाने दिलेले कोणतेही स्पष्टीकरण किंवा केलेले अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, त्यास योग्य वाटेल असे निदेश देता येतील आणि मंडळ, अशा निदेशांचे अनुपालन करील.

**४८. मंडळाने पुरवावयाची माहिती, विवरणे, इत्यादी.-** (१) मंडळ, शासन फर्मावील असे अहवाल, विवरणे आणि विवरणपत्रे आणि त्याच्या कामाशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात शासन मागवील अशी आणखी माहिती, शासनास पुरवील.

(२) असा कोणताही अहवाल, विवरणे किंवा विवरणपत्रे किंवा पुरविलेली माहिती विचारात घेतल्यानंतर, शासनास, आवश्यक असतील असे, या अधिनियमाशी सुसंगत असणारे निदेश देता येतील आणि मंडळ अशा निदेशांचे अनुपालन करील.

प्रकरण सहा

## पूरक व संकीर्ण तरतुदी

**४९. समितीकडे सोपवलेल्या अधिकारांचा वापर करण्याची रीत.-** या अधिनियमाद्वारे मंडळास प्रदान केलेल्या, आणि जे, मंडळाने विनियमांद्वारे, समितीकडे सोपवले असतील त्या अधिकारांचा मंडळाकडून वापर करण्यासंबंधीच्या सर्व बाबी, त्या समितीकडे सोपविल्या जातील आणि मंडळ, अशा कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यापूर्वी, विवादित बाबीसंबंधातील त्या समितीचा अहवाल स्वीकारील व त्यावर विचार करील.

**५०. विनियम करण्याचा मंडळाचा अधिकार.-** (१) मंडळास, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ, शासनाच्या मान्यतेने विनियम करता येतील.

(२) विशेषतः व पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाधा येऊ न देता, अशा विनियमांत पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही गोष्टींबाबत तरतूद करता येईल:-

(क) कलम २० अन्वये नेमलेल्या समित्यांची रचना, अधिकार व कर्तव्ये;

(ख) परीक्षांचे व मूल्यनिर्धारणाचे विषय व अभ्यासक्रम;

(ग) परीक्षांसाठी, नियमित व बाह्य उमेदवारांना प्रवेश देण्याचे नियमन करणा-या सर्वसाधारण शर्ती आणि ज्यांची पूर्तता केल्यावर अशा कोणत्याही परीक्षेसाठी व मूल्यनिर्धारणासाठी प्रवेश मिळण्याचा आणि उपस्थित राहण्याचा विद्यार्थ्याला हक्क असेल अशा, पात्रता, उपस्थिती, सांघिक कार्य या संबंधीच्या विशिष्ट शर्ती;

(घ) कोणत्याही विषयात व एकूण परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी तसेच कोणत्याही विषयात सूट, विशेष श्रेयांक व विशेष प्राविण्य मिळविण्यासाठी आवश्यक असलेले गुण;

(ङ) परीक्षांसाठी प्रवेश फी व त्या परीक्षांच्या, मूल्यनिर्धारणांच्या, संलग्नतेच्या व परवानगीच्या संबंधातील इतर बाबींच्याबाबत प्रदेय असलेली इतर फी व आकार;

(च) परीक्षा घेणे व निकाल प्रसिद्ध करणे यांची व्यवस्था;

(छ) परीक्षकांची, मूल्यनिर्धारकांची नेमणूक, परीक्षांसंबंधातील व मूल्यनिर्धारणांसंबंधातील त्यांचे अधिकार व कर्तव्ये आणि त्यांचे पारिश्रमिक व ते प्रदान करण्याची पद्धत;

(ज) परीक्षकांची व मूल्यनिर्धारकांची पात्रता व अपात्रता;

(झ) निकाल घोषित केल्यानंतर, प्रमाणपत्रे व पदविका प्रदान करणे;

(ञ) मंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांची मंडळाच्या स्वतःच्या कार्यालयात किंवा जिल्हा कार्यालयात नेमणूक करणे व त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती;

(ट) मंडळाच्या वित्तीय व्यवस्थेचे सर्व बाबतीत नियंत्रण, प्रशासन, सुरक्षित अभिरक्षा व व्यवस्थापन;

(ठ) मंडळ, ज्या तारखेपूर्वी व ज्या रीतीने त्याचा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करील ती तारीख वरीत;

(ड) मंडळाच्या व त्याने नेमलेल्या समित्यांच्या सदस्यांना आहरित करावयाचा भत्ता;

(ढ) परीक्षांच्या व मूल्यनिर्धारणाच्या सुरळीत संचालनासाठी, शासनाच्या व इतर परिसंस्थाच्या, अधिका-यांची व कर्मचारीवर्गाची नेमणूक करणे व त्यांचे भत्ते;

(ण) पाठ्यक्रम चालवण्याकरिता परवानगी मिळण्यासाठी नवीन अर्जासाठी कार्यपद्धती, मानके व प्रमाणके ठरविणे;

(त) नवीन परिसंस्थेला मान्यता देणे, विद्यमान परिसंस्थेमधील प्रवेशसंख्या वाढविणे किंवा अतिरिक्त पाठ्यक्रम वाढविणे;

(द) मंडळाचे अभिलेख जतन करणे;

(ध) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, नियामक परिषदेच्या मते, ज्या बिगर विद्याविषयक बाबींसाठी तरतूद आवश्यक आहे, अशा सर्व बिगर विद्याविषयक बाबी:

(न) या अधिनियमान्वये विहित करावयाची किंवा विहित करता येईल किंवा विनिर्दिष्ट करता येईल किंवा निश्चित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या कलमान्वये केलेले कोणतेही विनियम, त्यास शासनाकडून मंजुरी देण्यात येईपर्यंत आणि मंडळाकडून **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईपर्यंत अंमलात येणार नाहीत.

**५१. पहिले विनियम.-** (१) कलम ५० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पहिले विनियम, शासनाद्वारे तयार करण्यात येतील व **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील आणि मंडळाकडून नवीन विनियम रीतसर तयार करण्यात येईतोपर्यंत ते अंमलात असणे सुरू राहतील.

(२) जर शासनास, कलम ५० मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबीपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात कोणतेही नवीन विनियम करणे इष्ट आहे किंवा पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या किंवा कलम ५० अन्वये मंडळाने केलेल्या कोणत्याही विनियमांमध्ये फेरबदल करणे किंवा एकतर, ते पूर्णतः किंवा अंशतः निरसित करणे इष्ट आहे असे कोणत्याही वेळी वाटले तर, शासनास, मंडळाशी विचारविनिमय केल्यानंतर व **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अशा कोणत्याही विनियमांत फेरबदल करण्यासाठी किंवा ते एकतर पूर्णत: किंवा अंशतः निरसित करण्यासाठी असे विनियम करता येतील. अशा प्रकारे तयार केलेले, फेरबदल केलेले किंवा निरसित केलेले विनियम, शासन, अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करील अशा तारखेपासून किंवा अशी कोणतीही तारीख विनिर्दिष्ट नसेल तर **शासकीय राजपत्रातील** उक्त अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून, अशा तारखेपूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या बाबतीत असेल ते खेरीजकरून, अंमलात येतील.

**५२. उपविधी करण्याचा मंडळाचा अधिकार.-** (१) मंडळास, पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात तरतूद करण्यासाठी या अधिनियमाशी सुसंगत आणि नियामक परिषदेच्या मान्यतेने उपवधी करता येतील:-

(क) मंडळाच्या व मंडळाने नेमलेल्या समित्यांच्या बैठकांमध्ये अनुसरावयाची कार्यपद्धती व अशा बैठकीमध्ये गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असलेली सदस्य संख्या;

(ख) या अधिनियमाद्वारे आणि त्याखाली केलेल्या विनियमांद्वारे ज्याबाबत तरतूद केलेली नसेल अशी, केवळ मंडळांशी व त्याच्या समित्यांशी संबंधित असलेली इतर कोणतीही बाब .

(२) पोट-कलम (१) अन्वये केलेले उपविधी, मंडळाद्वारे **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील.

**५३. शंका उपस्थित झाल्याच्या बाबतीत अन्वयार्थ लावणे.-** जर हा अधिनियम किंवा त्यान्वये केलेले कोणतेही विनियम किंवा उपविधी यांच्या कोणत्याही तरतुदींच्या अर्थासंबंधी कोणताही प्रश्न उपस्थित झाला तर, ती बाब, निर्णयासाठी शासनाकडे निर्देशित करता येईल, आणि मंडळाच्या सदस्यांपैकी किमान तीन सदस्यांनी तशी मागणी केल्यास, ती बाब अशाप्रकारे निर्णयासाठी राज्य शासनाकडे निर्देशित करण्यात येईल. त्या बाबीवरील शासनाचा निर्णय अंतिम असेल.

**५४. परिसंस्थांची कर्तव्ये व त्यांच्याकडून सहाय्य.-** प्रमाणपत्र व पदविका स्तरावरील सर्व संलग्न व स्वायत्त परिसंस्था, मंडळास, या अधिनियमाखालील त्यांच्या कर्तव्याचे पालन करण्यासाठी आणि कार्ये पार पाडण्यासाठी, त्यास आवश्यक असेल अशी मदत व सहाय्य करतील.

**५५. सद्भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.-** या अधिनियमानुसार, अथवा कोणतेही विनिमय किंवा उपविधी यांनुसार सद्‌भावपूर्वक केलेल्या अथवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या अथवा करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल, शासन, नियामक परिषद, मंडळ अथवा सदस्य यांच्याविरुद्ध किंवा शासनाच्या अथवा नियामक परिषदेच्या अथवा मंडळाच्या कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचा-यांविरुद्ध कोणताही दावा, खटला अथवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

**५६. मंडळाचे सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी लोकसेवक असणे.-** मंडळाचे सर्व सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी, जेव्हा या अधिनियमातील कोणत्याही तरतुदींनुसार कार्य करतील अथवा करण्याचे अभिप्रेत असेल तेव्हा, भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येतील.

**५७. नियम करण्याचा अधिकार.-** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येईल.

(२) विशेषतः व पुर्वगामी तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाधा न येता, अशा नियमांमध्ये पुढीलपैकी सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींची तरतूद करता येईल:-

(क) कलम ६ च्या पोट-कलम (३६) खालील मंडळाची इतर कोणतीही उद्दिष्टे;

(ख) कलम ३९ च्या पोट-कलम (७) अन्वये परिसंस्था ताब्यात घेण्यासाठी किंवा अन्य व्यवस्थापनाकडे हस्तांतरण करण्यासाठी पालन करावयाची कार्यपद्धती;

(ग) कलम ३९ च्या पोट-कलम (८) अन्वये टप्प्यापट्याने बंद करण्याची कार्यपद्धती;

(घ) विहित करणे आवश्यक असेल किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या अधिनियमाखाली करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो अशा प्रकारे करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीसाठी राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात येईल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा असा कोणताही नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहे सहमत होतील आणि असा निर्णय **शासकीय राजपत्रामध्ये** अधिसूचित करतील तर तो नियम, **शासकीय राजपत्रामध्ये**, अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही.. तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

**५८. व्यावृत्ती .-** (१) विद्यमान मंडळाच्या प्रत्येक समितीची, व्यवहार्य असेल तेथवर, परंतु या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून, सहा महिन्याच्या कालावधीत, या अधिनियमाच्या तरतुदींना अनुसरून पुनर्रचना करण्यात येईल.

(२) कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अध्यक्ष, सचिव, उपसचिव, सहायक सचिव, निरीक्षक, लेखा अधिकारी, परीक्षा नियंत्रक म्हणून विद्यमान मंडळाचे पद धारण करणारी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये शासनाने नियुक्त केलेला संबंधित अधिकारी त्याच्या पदावर हजर होईपर्यंत उक्त पद धारण करण्याचे चालू ठेवील.

(३) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, विद्यमान मंडळाशी संलग्न अथवा मान्यता प्राप्त सर्व परिसंस्था, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये त्यांची संलग्नता किंवा मान्यता काढून घेतली जाईपर्यंत किंवा तिच्यासंबंधी फेरविचार होईपर्यंत मंडळाशी संलग्न किंवा मान्यताप्राप्त असल्याचे मानले जाईल.

(४) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी असलेले विद्यमान मंडळाच्या आणि महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेच्या सर्व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे विद्यमान विद्यार्थी, मंडळाने मान्यता दिलेल्या परिसंस्थांचे विद्यार्थी म्हणून नियमितपणे राहतील.

(५) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी असलेले विद्यमान मंडळाने व महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेने मान्यता दिलेले पाठ्यक्रम व प्रमाणपत्र हे, मंडळाचे मान्यताप्राप्त पाठ्यक्रम व प्रमाणपत्र असल्याचे चालू राहतील.

(६) ज्या विद्यमान मंडळाच्या कोणत्याही विशेषाधिकारांस हक्कदार होत्या अशा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी असलेल्या सर्व शैक्षणिक परिसंस्था या अधिनियमाखाली मंडळाच्या, तत्सम विशेषाधिकारांस हक्कदार असल्याचे मानले जाईल.

(७) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, या अधिनियमाच्या उद्देश व प्रयोजनांशी संबंधित असणारी, विद्यमान मंडळाने स्वीकारलेली किंवा त्यांना मिळालेली आणि त्याने धारण केलेली सर्व धर्मदाने, मंडळाने, या अधिनियमाखाली स्वीकारली असल्याचे किंवा ती त्यास मिळाली असल्याचे किंवा त्याने धारण केली असल्याचे मानण्यात येईल, आणि ज्या शर्तीवर अशी धर्मदाने स्वीकारण्यात आली होती किंवा मिळाली होती किंवा धारण केली होती त्या सर्व शर्ती, या अधिनियमातील कोणत्याही तरतुदींशी विसंगत असल्या तरीही, या अधिनियमान्वये विधीग्राह्य असल्याचे मानण्यात येईल.

(८) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी असलेले, विद्यमान मंडळाच्या सर्व जंगम किंवा स्थावर मालमत्ता, आणि कोणत्याही स्वरूपाचे सर्व हक्क व हितसंबंध, आणि सर्व अधिकार आणि विशेषाधिकार, मंडळाकडे हस्तांतरित होतील व मंडळात निहित राहतील आणि ज्या उद्देशाकरिता व प्रयोजनार्थ मंडळ घटित केले आहे, त्याच उद्देशांकरिता व प्रयोजनांसाठी त्यांचा वापर करण्यात येईल.

(९) महाराष्ट्र राज्यात व्यवसाय शिक्षणाला चालना देण्याच्या कोणत्याही योजनेच्या बाबतीत, या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनांकरिता मंडळ प्रथमतः स्थापन होण्यापूर्वी, राज्य शासनाद्वारे किंवा विद्यमान मंडळाद्वारे शासनाशी किंवा विद्यमान मंडळाशी केलेले किंवा शासनाकरिता किंवा विद्यमान मंडळाकरिता

पत्करलेली सर्व दायित्वे, केलेले सर्व करार आणि अभियोजित केलेल्या इतर सर्व बाबी व गोष्टी या, मंडळाद्वारे किंवा या मंडळाशी किंवा या मंडळाकरिता पत्करण्यात आले असल्याचे, करण्यात आले असल्याचे किंवा अभियोजित करण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल आणि तद्नुसार राज्य शासनाद्वारे किंवा, यथास्थिति, विद्यमान मंडळाद्वारे किंवा त्यांविरूद्ध चालविण्यात आलेले किंवा चालविण्यात येऊ शकतील असे दावे (हक्कमागण्या) किंवा दाखल केलेले वाद किंवा कायदेशीर कार्यवाह्या, मंडळाद्वारे किंवा मंडळाविरूद्ध पुढे चालू ठेवता येतील किंवा चालविता येतील.

(१०) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी विद्यमान मंडळाने किंवा त्याच्या विरुद्ध दाखल केलेल्या किंवा अंमलबजावणीयोग्य असलेल्या सर्व वैध कार्यवाह्या किंवा उपाययोजना ह्या, या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या मंडळाकडून किंवा त्याच्याविरुद्ध चालविता येतील, किंवा, यथास्थिति, अंमलबजावणी करता येतील;

(११) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी पत्करलेली आणि विद्यमान मंडळाच्या नावे कायदेशीरपणे अस्तित्वात असलेली सर्व ऋणे, दायित्वे व आबंधने यांची मंडळाकडून फेड व पूर्तता करण्यात येईल.

(१२) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी विद्यमान मंडळाच्या नावे केलेले, कोणतेही मृत्यूपत्रित दान, दान, अटी किंवा विश्वस्तव्यवस्था यांचा ज्यात अंतर्भाव आहे असे कोणतेही मृत्यूपत्र, विलेख किंवा इतर दस्तऐवज यांचा, जणू काही या अधिनियमाच्या प्रारंभास व तेव्हापासून त्यामध्ये विद्यमान मंडळाऐवजी, मंडळाचे नाव दाखल करण्यात आले आहे त्याप्रमाणे अन्वयार्थ लावण्यात येईल.

(१३) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी असलेल्या कोणत्याही अधिनियमितीमध्ये किंवा कोणत्याही अधिनियमीतीअन्वये काढलेल्या इतर संलेखांमध्ये असलेल्या विद्यमान मंडळाच्या सर्व निर्देशांचा, या अधिनियमान्वये घटित केलेल्या मंडळाचे निर्देश असल्याप्रमाणे अन्वयार्थ लावण्यात येईल.

(१४) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेल्या आदेशान्वये केलेली परीक्षकांची नियुक्ती ही, या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता त्याअन्वये स्थापन केलेल्या मंडळासाठी केलेली नियुक्ती असल्याचे मानले जाईल, आणि असे परीक्षक या अधिनियमाखाली, नवीन नियुक्त्या केल्या जाईपर्यंत ती पदे धारण करतील व त्यांची कर्तव्ये व कार्ये पार पाडतील.

(१५) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी विद्यमान मंडळाच्या अधिका-यांना व कर्मचा-यांना लागू असलेले सेवा विनिमय, या अधिनियमान्वये विहित केले असल्याचे मानले जाईल आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये अन्यथा तरतूद केली असेल त्या खेरीज, या अधिनियमाच्या तरतुदीनुसार त्यांचे अधिक्रमण केले जाईपर्यंत ते नियमितपणे अंमलात राहतील.

(१६) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी कोणत्याही प्राधिका-याने काढलेल्या किंवा जारी केलेल्या सर्व नोटीसा व आदेश आणि विद्यमान मंडळाचे आदेश व परिपत्रके, ते जेथवर या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर अंमलात असण्याचे चालू राहतील आणि ते या अधिनियमान्वये काढलेले किंवा जारी केले असल्याचे मानले जाईल.

**५९. अडचणी दूर करण्याचा अधिकार.-** (१) जर या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवली तर, राज्य शासनास, प्रसंगानुरूप उद्‌भवेल त्याप्रमाणे, **शासकीय राजपत्रात** आदेश प्रसिद्ध

करून त्याद्वारे ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल:

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.